रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक २८१
www.ramprahar.com

# राम प्रहर

मंगळवार, २९ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग

'शासनाच्या सर्व सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन करा'/२

खडकाळ जमिनीतून वाहू लागले पाण्याचे झरे/५

कबड्डी स्पर्धेत बल्लाळेश्वर पाली संघ विजेता/८

## युरोपात ब्लॅकआउट! फ्रान्स, स्पेनसह अनेक देशांमध्ये सेवा ठप्प



**पॅरिस :** युरोपमधील अनेक देशांत अचानक विजेचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. स्पेन आणि पोर्तुगालसह अन्य ठिकाणी मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा खंडित झाला, ज्यामुळे हवाई सेवांपासून ते मेट्रोसारख्या विविध वाहतुकीच्या सोयींवर परिणाम झाला आहे. या ब्लॅकआउटमुळे ट्रॅफिक लाईट बंद पडले आणि मेट्रो सेवा थांबल्या, ज्यामुळे रस्त्यांवर गोंधळ उडाला. रुग्णालयांमधील अत्यावश्यक सेवा बॅकअप जनरेटरच्या मदतीने चालवल्या जात आहेत, परंतु अधिकाऱ्यांनी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना संगणक बंद करण्याचे आणि वीज वाचवण्यासाठी इतर उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. सध्या तरी हे संकट किती काळ राहील हे स्पष्ट नाही. यामागील कारण शोधले जात आहे. हा सायबर हल्ला असू शकतो, असे मानले जात आहे. या अनपेक्षित संकटाने युरोपला पुन्हा एकदा गांभीर्याने विचार करण्यास भाग पाडले आहे.

# विकासात महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. त्यामध्ये रस्ते, रेल्वे, बुलेट ट्रेन, जलमार्ग आदींसह बंदर आणि विमानतळ विकासाच्या कामांचा समावेश आहे. या संपूर्ण विकासाच्या 'इकोसिस्टीम'मुळे राज्यात मोठी गुंतवणूक होत आहे. महाराष्ट्र विकासाच्या बाबतीत देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबईतील हॉटेल फोर सीजन येथे इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडर समिट २०२५चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत सीएनबीसी टीव्ही १८ वृत्तवाहिनीच्या संपादक शिरीन भान यांनी घेतली. त्या वेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम गतीने सुरू आहे. या ट्रेनने २०२८पर्यंत प्रवास करणे शक्य होणार आहे. वाढवण बंदराजवळ बुलेट ट्रेनचे स्थानक निर्माण करण्यात येणार आहे. मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. सागरी किनारा रस्ता, अटल सेतू, विविध मेट्रो मार्गांची कामे ही त्यातली ठळक उदाहरणे आहेत. या सर्व विकासकामांमुळे मुंबईत गुंतवणूक ५० बिलियन डॉलरपर्यंत जाईल. पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रकल्प गेम चेंजर ठरणारे आहेत. यासोबतच पुणे येथील नवीन विमानतळ, शिर्डी, नागपूर विमानतळाचा विकास, नदीजोड प्रकल्प, बुलेट ट्रेन प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.




सागरी किनारा रस्ता विरारपर्यंत वाढविण्यात येत आहे. वाढवण बंदर हे सध्या अस्तित्वात असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्टपेक्षा तीन पट मोठे आहे. या बंदराला प्रवेश नियंत्रित असलेल्या महामार्गाने नाशिकपर्यंत जोडण्यात येऊन पुढे समृद्धी महामार्गाला जोडण्यात येईल. वाढवण बंदराजवळ नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे तसेच या परिसरात चौथ्या मुंबईचेही निर्माण करण्यात येणार आहे, असे सांगून कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात पुरामुळे वाहून जाणारे पाणी तसेच पश्चिम घाटातून समुद्रात वाहून जाणारे पाणी उजनी धरण व मराठवाड्यात वळविण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात मराठवाडा निश्चितच दुष्काळमुक्त होणार आहे. समृद्धी महामार्गानंतर राज्यात नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्ग निर्माण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र हे नेहमी भविष्यासाठी 'रेडी' असणारे राज्य आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### एज्युसिटी, हेल्थ सिटी, इनोवेशन सिटी उभारणार

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच अटल सेतूमुळे तिसरी मुंबई निर्माण होणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या भागात नवीन एज्युसिटी निर्माण करण्यात येत आहे. जगभरातील विविध नामांकित विद्यापीठे या परिसरात शैक्षणिक दालन उघडणार आहेत. त्यासोबतच हेल्थ सिटी, इनोवेशन सिटीचे निर्माणही करण्यात येत आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली.

## पनवेलमध्ये शेकापला, तर खालापुरात काँग्रेसला धक्का!

# शेकाप नेते प्रभूदास भोईर, काँग्रेसचे कृष्णाशेठ पारंगे समर्थकांसह भाजपमध्ये





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेकाप वाहतूक संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रभूदास भोईर ऊर्फ प्रभूअण्णा यांनी त्यांच्या जवळपास पंधराशे कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश करीत पनवेलमध्ये शेतकरी कामगार पक्षाला मोठा दणका दिला, तर खालापूर तालुक्यातील काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष कृष्णाशेठ पारंगे यांनीही त्यांच्या समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. प्रभूदास भोईर यांचे मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते भाजपची शाल देऊन पक्षात स्वागत करण्यात आले, तर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते कृष्णाशेठ पारंगे यांना प्रवेश देण्यात आला.

विविध पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये जाहीर पक्षप्रवेश आणि उत्तर रायगड जिल्ह्यातील नवनियुक्त मंडळ अध्यक्षांचा सत्कार समारंभ रविवारी (दि. २७) पनवेलमध्ये झाला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा परिषदेचे माजी प्रभारी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, उपाध्यक्ष जयंत पगडे, सुधीर ठोंबरे, उरण तालुका माजी अध्यक्ष रवी भोईर, माजी नगरसेवक अनिल भगत, विजय चिपळेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, जीवन गावंड, अमित जाधव, ज्ञानेश्वर घरत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रभूअण्णा यांच्यासोबत वाहतूक संघटनेचे उपाध्यक्ष अतुल मारुती घरत, कार्याध्यक्ष विजय भोईर, माजी नगरसेविका प्रिया भोईर, प्रदेश खजिनदार भूषण म्हात्रे, कोन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अशोक म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य गुरूनाथ ठाकूर, समीर दळवी, ग्रामपंचायत सदस्य गोरख धुमाळ, विश्वनाथ शेळके, विशाल घरत, पनवेल तालुका वाहतूक अध्यक्ष प्रभाकर नाईक आणि शेकापच्या हजारो कार्यकर्त्यांनी, तर कृष्णाशेठ पारंगे यांच्यासोबत चांभार्ली ग्रामपंचायतीचे सरपंच प्रतिप पाटील, दापिवलीचे सुरेश गाताडे, देवळोलीचे माजी सरपंच रोहिदास पाटील, ग्रामपंचायत सदस्य सचिन चाळके, समीर दळवी, ललिता पडवळ, किशोर शिंदे, आनंद चव्हाण, प्रल्हाद शिंदे तसेच मनसेचे बारवई अध्यक्ष सचिन पडवळ व त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे पनवेलमध्ये शेकापला, तर खालापूर तालुक्यात काँग्रेसला खिंडार पडले आहे.

उत्तर रायगड जिल्ह्यातील नवनियुक्त खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, नेरे मंडळ भूपेंद्र पाटील, कामोठे मंडळ विकास घरत, पनवेल शहर मंडळ सुमित झुंझारराव, कळंबोली मंडळ अमर पाटील, नवीन पनवेल मंडळ दशरथ म्हात्रे, तळोजा मंडळ दिनेश खानावकर, कर्नाळा मंडळ मंगेश वाकडीकर, उलवा मंडळ रूपेश धुमाळ, उरण शहर मंडळ प्रसाद भोईर, उरण ग्रामीण मंडळ धनेश गावंड, कर्जत शहर मंडळ राजेश लाड, कर्जत ग्रामीण मंडळ दिनेश रसाळ, खालापूर पश्चिम मंडळ प्रवीण मोरे, खालापूर पूर्व मंडळ सनी यादव, खोपोली मंडळ राहुल जाधव व नेरळ मंडळ अध्यक्ष नरेश मसणे यांचा या सोहळ्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. **(पान २ वर..)**

### आगे आगे देखो होता है क्या –लोकनेते रामशेठ ठाकूर

आपल्या परिसराचा विकास व्हावा यासाठी विविध पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते भारतीय जनता पक्षात सहभागी होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत घवघवीत यशस्वी कामगिरी केली आहे तसेच पनवेल मतदारसंघातदेखील पक्षाला चांगले यश मिळाले असून येणाऱ्या काळात आपले आणखी आमदार वाढणार आहेत. आपला विभाग मजबूत करा. पनवेल महापालिका, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या दृष्टिकोनातून कामाला लागा. भाजपमध्ये ज्या वेगाने पक्षप्रवेश होतायेत ते पाहता येणाऱ्या काळात हा जिल्हा संपूर्ण भाजपमय होईल, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी करतानाच 'आगे आगे देखो होता है क्या' असे सूचक वक्तव्य केले.

## निवडक

### भारताचा पाकिस्तानवर डिजिटल स्ट्राईक; युट्यूब चॅनेल्सवर बंदी

**नवी दिल्ली :** जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात अनेक कठोर पावले उचलली आहेत. आता केंद्र सरकारने १६ पाकिस्तानी युट्यूब चॅनेलवर बंदी आणली आहे. यामध्ये प्रमुख वृत्तसंस्थांसहित माजी क्रिकेटपटू शोएब अख्तरच्या चॅनेलचाही समावेश आहे.

### भारत–फ्रान्समध्ये राफेल विमानांच्या खरेदीचा करार

**नवी दिल्ली :** भारताने संरक्षणाच्या दृष्टीने २६ राफेल मरीन लढाऊ विमानांसाठी फ्रान्ससोबत ६३ हजार कोटी रुपयांचा करार केला आहे. या कराराच्या स्वाक्षरी कार्यक्रमावेळी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. नव्या विमानांमुळे भारताची ताकद अधिक वाढणार आहे.

## स्व. दिलीप देसले यांची शोकसभा; मान्यवरांकडून आदरांजली




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जम्मू–कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निष्पाप पर्यटकांना लक्ष्य करण्यात आले. यात नवीन पनवेल येथील सुस्वभावी व्यक्तिमत्व दिलीप देसले यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या अकस्मिक निधनामुळे शोककळा पसरली आहे. स्व. देसले त्यांच्या स्मरणार्थ रविवारी (दि. २७) नवीन पनवेल येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

शोकसभेला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी स्व. दिलीप देसले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, दिलीप देसले यांचा समाजातील चांगल्या कार्याला नेहमीच पाठिंबा होता. त्यांच्यासारख्या व्यक्तीच्या जाण्याने समाजात हळहळ व्यक्त होत आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्याला शांती आणि कुटुंबियांना या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो. **(पान २ वर..)**

## महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दलाची स्थापना

**मुंबई :** पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल (पर्यटन मित्र) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यटन क्षेत्रातील वाढत्या संधी, नैसर्गिक, सांस्कृतिक विविधतेचा विचार करता पर्यटकांना सुरक्षित पर्यटनाचा अनुभव देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी सोमवारी (दि. २८) दिली. राज्यातील पर्यटनस्थळे, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा यांची माहिती पुरविणे हा या पर्यटन सुरक्षा दलाचा मुख्य उद्देश असणार आहे. १ ते ४ मेदरम्यान होणाऱ्या सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर महोत्सवात महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात येणार आहे. राज्यात पर्यटनस्थळावर पर्यटकांच्या सेवेसाठी पर्यटन पोलिसांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात येणार आहे, असे पर्यटनमंत्री देसाई यांनी सांगितले.






# शासनाच्या सर्व सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अधिकाधिक लोकाभिमुख झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करा. १५ ऑगस्ट पर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करा.शासनाचा विभाग १५ ऑगस्टपर्यंत जो विभाग त्यांच्या सेवा ऑनलाईन करणार नाहीत त्या विभागाला दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. शासनाकडून कोणत्या सेवा नागरिकांना दिल्या जातात याची शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना या विषयाबाबत माहिती व्हावी यासाठी या अधिनियमाचा अभ्यासात समावेश करण्यासाठी कार्यवाही करावी अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.



सह्याद्री अतिथीगृह येथे सामान्य प्रशासन विभाग (प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता व सुशासन) व महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची दशकपूर्ती आणि प्रथम सेवा हक्क दिन निमित्त राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

यावेळी या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव,ब्रँड अँबेसिडर पद्मश्री शंकर महादेवन, सोनाली कुलकर्णी, माजी राज्य सेवा हक्क मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रीय,राज्य सेवा हक्क कोकणचे आयुक्त बलदेव सिंह, पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यासह प्रशासनातील ज्येष्ठ वरिष्ठ सनदी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सध्या हजार पेक्षा जास्त सेवा या कायद्याच्या अंतर्गत अधिसूचित केल्या आहेत. जवळपास ५८३ सेवा ऑनलाइन दिलेल्या आहेत. अजून ३०० सेवा या ऑनलाइन आणायच्या आहेत तर १२५ सेवा ऑनलाइन आहेत पण त्या कॉमन पोर्टलवर उपलब्ध नाहीत आणि म्हणून शासनाच्या सर्व विभागांना १५ ऑगस्ट पर्यंत सर्व सेवा ऑनलाईन करा.१५ ऑगस्ट पर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करा.जो शासनाचा विभाग १५ ऑगस्ट पर्यंत झाली नाही त्या विभागातील प्रत्येक सेवेकरिता दर दिवशी प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे मूलभूत अधिकार आपल्या संविधानात समाविष्ट केले हे मूलभूत अधिकार अधिकार सर्वांना मिळाले पाहिजेत.गेल्या दहा वर्षात तंत्रज्ञानाच्या गतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात फरक पडलेला आहे आणि म्हणून या सेवा अधिक गतिमान पद्धतीने करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत.मंत्रालयात चेहरा पडताळणी पमुळे देखील निम्मी गर्दी कमी झाली आहे. जीवनामध्ये इज ऑफ लिविंग आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.शासनाची सर्व सेवा व्हॉटसप वर तसेच सर्व माहिती संकेतस्थळावरती उपलब्ध झाल्यास अनेक तक्रारी कमी होवून लोकांचे जीवनमान सुसह्य होईल असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, लोकशाहीत लोकांसाठी कर्तव्य भावनेने काम करायचे असते. लोकसेवा हा केवळ कायदा नाही तर ती एक उदात्त भावना आहे असं आपण म्हणतो या वाक्याला लोकसेवा हक्क आयोगाने खरा अर्थ मिळवून दिला आहे.हा कायदा म्हणजे खऱ्या अर्थाने लोकशाहीची गंगोत्री आहे. नाविन्यपूर्ण उपक्रम वर्धा,यवतमाळ आणि कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यात राबवले त्यांचा आताच सत्कार करण्यात आला. अशाच प्रकारे इतर जिल्ह्यातही काम केले जावे.खर तर जिथे समाजाला त्यांचे सर्व हक्क आणि अधिकार त्यांना सेवा दिल्या जातात तिथे प्रगती अटळ असते.हा कायदा प्रशासन व नागरिकांमधला विश्वासाचा एक पूल आहे असं म्हटलं तर वावग ठरणार नाही आणि म्हणून सर्वसामान्य जनतेच्या सक्षमीकरणाचा हा पाया अधिक मजबूत होईल आणि या अधिनियमच्या माध्यमातून लोकांना तात्काळ सेवा मिळतील, असेही ते म्हणाले.

मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्या की,जनतेला ऑनलाईन सेवा देण्यासाठी आयोग नक्कीच प्रभावी अंमलबजावणी करेल.

## रेल्वे स्टेशनवरील चहा विक्रेत्यांवर वैधमापनशास्त्र विभागाची कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या रेल्वे स्थानकावरील स्टॉलवर चहा, खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री होत असते. सहनियंत्रक, वैधमापन शास्त्र कोकण विभागचे शिवाजी काकडे, यांच्या सूचनेवरून नूकतिच कारवाई करण्यात आली.

ठाणे जिल्हयातील कल्याण व ठाणे, पालघर जिल्हयातील वसई, रायगड जिल्हयातील पनवेल व कर्जत, रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण व रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयातील कुडाळ या रेल्वे स्टेशनवर संबंधित जिल्हा उपनियंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली चहा, खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री करणाऱ्या आस्थापनांवर अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वैधमापन शास्त्र यंत्रणेतील निरीक्षकांनी अचानक भेटी देवून नूकतिच कारवाई करण्यात आली. वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ मधील तरतूदीन्वये तपासणी केली.

रेल्वे स्टेशनवरील चहा विक्री करणाऱ्या आस्थापनांना १५०/१८० मिली एवढी घोषित प्रमाण असताना तपासणीमध्ये ३० ते ८० मिली एव्हढा चहा कमी देत असल्याचे आढळून आले. अश्या एकूण ७ आस्थापनांवर वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ मधील तरतूदीन्वये प्रकरण दाखल करण्यात आले. वापरात असलेली तोलन उपकरणे विहित मुदतीत फेर पडताळणी व मुद्रांकन करून न घेतल्यामुळे ०४ प्रकरणे दाखल करण्यात आली. चिपळूण व रत्नागिरी स्टेशनवरील आस्थापनेवर विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या आवेष्टित वस्तूवर नियमातील तरतूदीन्वये घोषवाक्य नमूद न केल्यामुळे प्रकरण दाखल करण्यात आले आहे.अशी माहिती कोकण विभागाचे सहनियंत्रक,वैध मापन शास्त्राचे शिवाजी काकडे यांनी दिली.

## ढालघर फाटा ते विंचवली रस्त्यालगत जुन्या झाडाला आग; वीजपुरवठा खंडित

**माणगाव : बातमीदार**

मुंबई – गोवा महामार्गापासून ढालघर फाटा ते विंचवली लगत असणाऱ्या कालव्या जवळील एक जुने सुकलेले भलेमोठे झाड २३ एप्रिल रोजी मध्यरात्री १२ च्या सुमारास आग लागल्याने जवळून जाणाऱ्या विद्युत वाहक खांबावर पडल्याने संपूर्ण विजेची तार रस्त्यावर पडली होती. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने वायरमन यांना रात्री बारा वाजता फोन लावून सांगितले तेंव्हा वायरमन यांनी येऊन संपूर्ण वीज बंद केल्यामुळे जिवीतहानी टळली.



दुसऱ्या दिवशी सकाळपासून वायरमन यांनी आजूबाजूला असणारी सर्व झाडे तोडून त्याठिकाणी दोन नवीन पोल उभे केले. संपूर्ण दिवसभर आजूबाजूच्या गावातील यावेळी वीज खंडीत करण्यात आली होती.

रात्रीच्या सुमारास पडलेली तार कोणाच्याही नजरेत आली नव्हती.परंतु होडगाव येथील व्यक्तीच्या नजरेस पडली आणि त्यांनी लगेचच वायरमन यांना कळविल्यामुळे जीवितहानी टळली. त्यानंतर एम.एस.ई.बी. चे कर्मचारी घटनास्थळी धाव घेऊन त्यांनी सर्व अडथळे दूर केले आणि दोन नवीन खांब उभारून वीजपुरवठा सुरळीत सुरू केला. यावेळी वायरमन नितीन धसाडे, मंगेश तोंडलेकर, रमेश गायकवाड, आकाश जाधव यांनी दिवसभर मेहनत घेऊन उकाड्यापासून हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा दिला. त्यांच्या कार्यतत्पर कामगिरीमुळे पूर्व विभागातील नागरिक त्यांच्या या कामावर खूष आहेत.

## तळाघर येथे विविध कामांचे लोकार्पण; मंत्री आदिती तटकरे यांची उपस्थिती

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तळाघर येथे शुक्रवार (दि. २५) रोजी महिला बाल महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते गावातील विविध विकासकामांचे लोकार्पण करण्यात आले. यामध्ये श्री. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रवेशद्वार नामकरण सोहळा, महिला महिला कार्यशाळा, एक दक्ष लक्ष पाण्याची अंडर ग्राउंड क्षमतेची पाण्याची साठवण टाकी, नवतरुण क्रीडा मंडळ तळाघर व्यायाम साहित्य, स्मशानभुमी व निवारी शेडचे लोकार्पण करण्यात आले.



खासदार तटकरेसाहेबांचे या विभागावर विशेष प्रेम आहे कारण या विभागातील जनतेशी जिव्हाळ्याचे नातं जोडलं गेलेलं आहे आणि हेच नातं अनिकेतभाई व माझ्यासह सर्व मंडळी जोपासण्याचे काम करीत आहे .तळाघर ग्रामपंचायतीचे सरपंच व तरुण मंडळी गावाचा विकासासाठी प्रयत्न करीत असल्याने खासदार तटकरे साहेबांच्या माध्यमातून निधी उपलब्ध होत आहे . ग्रामस्थांनी दिलेले विकास कामासंदर्भात नव्याने निवेदन आहेत यासाठी देखील जिल्हा नियोजन फंडातून यापुढेही निधी कमी पडून देणार नाही अशी ग्वाही मंत्री तटकरे तटकरे यांनी दिली .

या वेळी माजी आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, विठ्ठल मोरे बळीराजा फाउंडेशन अध्यक्ष, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी पंचायत सभापती अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, वरसे ग्रामपंचायत माजी सरपंच अमित मोहिते, वरसे गणाध्यक्ष दत्ता चव्हाण, जेष्ठ नेते शंकर भगत, महिला राष्ट्रवादी प्रदेश दिपिका चिपळुणकर, हरिश्चंद्र मोरे आगरी समाज तालुकाध्यक्ष, पदाधिकारी तळाघर सरपंच नथुराम माने, तहसीलदार किशोर देशमुख , सतिश भगत यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## शेकाप नेते प्रभूदास भोईर, काँग्रेसचे कृष्णाशेठ पारंगे समर्थकांसह भाजपमध्ये

### भाजप कार्यकर्त्यांना मान-सन्मान देणारा पक्ष -प्रभूदास भोईर

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब प्रत्येक कार्यकर्त्याच्या मागे खंबीरपणे उभे राहतात. लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांमुळे कार्यकर्त्यांची नेहमीच कॉलर टाईट असते. गेली २५ वर्ष माइयासारखा कार्यकर्ता त्यांची राजकीय कारकीर्द जवळून अनुभवतोय. मी व माझ्या अनेक समर्थकांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे आणि याचा सार्थ अभिमान वाटतोय, असे प्रतिपादन प्रभूदास भोईर यांनी केले. भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याने खऱ्या अर्थाने आमच्यासारख्या कार्यकर्त्यांसाठी आज आनंदाचा दिवस आहे. गेली २५ वर्षे आम्ही शेतकरी कामगार पक्षाचे काम करत होतो. कोणी लहान नाही किंवा मोठा नाही या भावनेने आम्ही एकदिलाने संघटनेचे काम केले, परंतु भाजप हा कार्यकर्त्यांना मान-सन्मान देणारा पक्ष आहे. त्यामुळे आम्ही भाजपमध्ये मोठ्या संख्येने प्रवेश केला आहे. यापुढे पक्षाच्या विचारधारेने व अधिक जोमाने काम करू, असेही प्रभूदास भोईर यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केले.

**आम्ही पिढ्यान्पिढ्या शेकापमध्ये होतो, परंतु भाजपमध्ये काम करणाऱ्याला संधी मिळते आणि या पक्षात काम करण्याची पद्धत चांगली आहे. त्यामुळे जगातील सर्वात मोठ्या भाजपमध्ये काम करण्याचा निर्णय घेतला.**
**-अतुल मारुती घरत**




## स्व. दिलीप देसले यांची शोकसभा; मान्यवरांकडून आदरांजली

या शोकसभेस भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस चारुशीला घरत, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, जगदीश घरत, खारघर शहर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, नवीन पनवेल शहर मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, उलवे मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, माजी नगरसेवक अनिल भगत, ॲड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर अभिषेक भोपी, रूपेश नागवेकर, रोहित जगताप, गौरव कांडपिळे, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, स्मिता वाणी, जितेंद्र वाघमारे, शिवाजी भगत, विजय म्हात्रे, राकेश भुजबळ, अक्षय सिंग, मयूर कदम, कोमल कोळी आणि स्व. दिलीप देसले यांचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेवा हक्क दिनी सिडकोच्या कर्मचाऱ्यांना शपथ



**नवी मुंबई : सिडको वृत्त**

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी २८ एप्रिल २०२५ रोजी सेवा हक्क दिनी सिडकोतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवा हक्काबाबतची शपथ दिली. या प्रसंगी गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारीमोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा कायदाअंमलात आणला. या अधिनियमातील कलम ४ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियत कालमर्यादेत जनतेला लोकसेवा देण्याची जबाबदारी दिली आहे त्यासाठी आवश्यक असणारे उत्तरदायित्वनिश्चित केले आहे. या कायद्याने अस्तित्वात आलेल्या राज्य सेवा हक्क आयोगाचे ब्रीदवाक्य आपली सेवा आमचे कर्तव्य हे आहे.या कायद्यच्या दशकपूर्तीनिमित्त महाराष्ट्र शासनाने २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन साजरा करण्याचे निर्देश दिले आहेत.

## पहलगाम हल्ल्याचा तळा येथे निषेध



**तळा -प्रतिनिधी**

तळा येथे जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या अतिरेकी हल्ल्याचा निषेध नोंदविण्यात आला आहे. जम्मू काश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेल्या निष्पाप पर्यटकांवर अतिरेक्यांनी हल्ला करून त्यांची गोळ्या घालून हत्या केली यामध्ये २८ निष्पाप नागरिकांना मृत्यू झाला आहे.

या घटनेबाबत तळा शहरात देखील सर्व धर्म व सकल हिंदू समाजातर्फे बळीचा नाका ते मारुती मंदिर अशी रॅली काढून पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देत पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून सदर घटनेचा निषेध नोंदविण्यात आला.

यावेळी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.तसेच अतिरेक्यांवर ठोस कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.याप्रसंगी सर्वपक्षीय पदाधिकारी, व्यापारी,तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोकिलाबेन अंबानी हॉस्पिटलचा जगातील सर्वोत्तम रुग्णालयांच्या रँकिंगमध्ये समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च इन्स्टिटयूट, मुंबईला २०२५ च्या जगातील सर्वोत्तम रुग्णालयांच्या प्रतिष्ठित यादीत स्थान मिळाले आहे. ही यादी न्यूजवीकने स्टेटिस्टाच्या सहकार्याने तयार केली आहे. रुग्णालयाची क्लिनिकल उत्कृष्टता, तांत्रिक नावीन्य घडवून आणण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न आणि रुग्ण-केंद्रित दृष्टिकोन यांच्या बळावर हे यश मिळाले.



न्यूजवीक आणि स्टॅटिस्टा यांनी ३० देशांमधील २,४४५ रुग्णालयांचे मूल्यांकन केले. हे रँकिंग रुग्णालयाचे जागतिक स्तरावरील स्थान दर्शवते. नावीन्य, पर्सनलाइजेशन आणि रुग्ण-केंद्रित देखभालीच्या माध्यमातून जगातील सर्वश्रेष्ठ मापदंडांना अनुरूप आरोग्य सेवा मापदंडांची नवी व्याख्या करणे या रुग्णालयाने कायम राखले आहे. कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट भारतामध्ये सर्वश्रेष्ठ रँकिंग असलेल्या रुग्णालयांपैकी एक आहे.

जगातील सर्वोत्तम रुग्णालयांचे रँकिंग हे एक अत्यंत विश्वासार्ह आणि प्रतिष्ठित जागतिक मूल्यांकन आहे, जे क्लिनिकल कामगिरी, रुग्णांचा अनुभव, रुग्णालयाची गुणवत्ता निर्देशक आणि वैद्यकीय व्यावसायिकांच्या जागतिक पॅनेलमधील इनपुटसह अनेक प्रमुख निकषांवर रुग्णालयांचे मूल्यांकन करते. या विशेष यादीत कोकिलाबेन अंबानी हॉस्पिटलचा समावेश आहे.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ

# पनवेलमध्ये विशाल मोर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या क्रूर दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ रविवारी पनवेलमध्येवारकरी संप्रदाय, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि हिंदू सेना पनवेल यांच्या संयु विद्यमाने एका विशाल निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

एस.टी. बस स्टँडपासून सुरू झालेला हा मोर्चा शहरातीलप्रमुख मागारवरून जात विरुपाक्ष मंदिराजवळ समाप्त झाला. या मोर्चामध्ये शेकडो नागरिक, वारकरी आणि हिंदू संघटनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या निष्पाप नागरिकांवरील भ्याड हल्ल२यात अनेक पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. या अमानुष कृत्याचा देशभरातून तीव्र निषेध व्ये होत आहे. या हल्ल२यातील शहीद नागरिकांना आदरांजली वाहण्यासाठी आणि दहशतवाद्यांच्या घृणास्पद कृत्याचा निषेध करण्यासाठी तसेच देशाच्या शत्रूंना कठोर संदेश देण्यासाठी या निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.



एस.टी. बस स्टँड येथून सुरू झालेल्या या मोर्च्यामध्ये सारे युवा जागेंगे, देश विरोधी भागेंगे, बातेंगे तो कटेंगेअसे निषेधाचे फलक हातात घेतलेले नागरिक घोषणाबाजी करत विरुपाक्ष मंदिराच्या दिशेने निघाले.मोर्चामध्ये सहभागी झालेल्या नागरिकांनी दहशतवाद मुर्दाबाद शहीद अमर रहे अशा घोषणांनीपरिसर दणाणून सोडला होता. या मोर्च्यामध्ये हल्ल२यातील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आलीआणि या कृत्याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला. उपस्थितांनी दहशतवाद्यांविरोधात कठोरकारवाई करण्याची मागणी केली.

या निषेध मोर्चामध्ये वारकरी संप्रदायाचे अनेक प्रमुख महाराज, विश्व हिंदूपरिषद, बजरंग दल आणि हिंदू सेना पनवेलचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये निलेश पाटील, परेश मुरबाडकर, आकाश भाटी, संजय मुरकुटे, गिरीश चव्हाण ,केतन ठाकरे, निखिल गुंदेचा, कुणाल जैतपाल, राकेश भांडे, निलेश महाराज ढवळे, संतोष महाराज सते, संजय महाराज पाटील, सुरेश महाराज पाटील, दिनेश महाराज मते, अजित महाराज खुटले, सुदर्शन महाराज मते,भरत महाराज भगत, योगेश महाराज भगत, कृष्णा महाराज पाटील, श्रीकांत महाराज रसाळ, काशिनाथ महाराज लबडे, पुंडलिक महाराज फडके, शुभम महाराज जाधव, भास्कर महाराज पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी अनेक वक्त्यांनी दहशतवादाच्या धोक्यावर प्रकाशटाकला आणि केंद्र सरकारला या संदर्भात कठोर पाऊले उचलण्याची विनंती केली. त्यांनी शहीद झालेल्या नागरिकांच्या कुटुंबियांप्रति संवेदना व्यक्त केल्या.

# भाताण ग्रामपंचायत उपसरपंचपदी भाजपच्या रसिका भोईर बिनविरोध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील भाताण ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक सोमवारी झाली. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या रसिका भोईर यांची बिनविरोध निवड झाली. याबद्दल भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनीत्यांना पुष्पगुच्छ देऊन रसिका भोईर यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढीलवाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, सरपंच तानाजी पाटील, सदस्य दिपक ठाकूर, अरुण पाटील, सदस्या अस्मिता काठावले, सदस्या रजनी मुकादम, माजी उपसरपंच अरुणा गाताडे, वंदनाअहीरे, तंटामुक्ती अध्यक्ष गुरुनाथ खारके, दत्तात्रेय ठाकुर, देवीदास पाटील, अनिल काठावले, किरण मुकादम, गणेश गाताडे, नथुराम भोईर, अनिल भोईर, सुदामठाकुर, विनोद सिंग, संतोष जुमारे, स्वप्नील भोईर, नथुराम पाटील, कल्याणी पाटील, संयोग टावरे व पदाधिकारी उपस्थित होते.

# पेट्रोलच्या टाकीचा कॉक तुटल्याने दुचाकीने घेतला पेट

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल शहरातील रेल्वे स्थानकासमोर एका दुचाकीने हातगाडीला धडक दिल्याने दुचाकी रस्त्यावर स्लिप झाली. यामुळे या दुचाकीच्या पेट्रोलच्या टाकीचा कॉक तुटला आणि पेट्रोल रस्त्यावर सांडल्याने दुचाकीने पेट घेतला.सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही. नवीन पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात बेकायदेशीर हातगाडयांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. महापालिकेचे अतिक्रमण विभाग या हातगाड्यांवर कारवाई करण्यात कुचकामी ठरत आहे.

सावंत कुटुंबीय कळवा, ठाणे वरून नवीन पनवेल येथे त्यांच्या नातेवाईकाकडे दुचाकीवरून वाढदिवसासाठी आले होते. यावेळी नवीन पनवेल रेल्वे स्थानकासमोर आले असता रस्त्याच्यामध्ये हातगाडी आल्याने त्यांच्या होंडा दुचाकीने या हातगाडीला धडक दिली. धडक दिल्याने दुचाकी स्लिप झाली. यावेळी दुचाकीवर असलेले सावंत कुटुंबीय खाली पडले. झालेल्या अपघातात दुचाकीचा पेट्रोलच्या टाकीजवळ असलेला कॉक तुटल्याने पेट्रोल खाली सांडले आणि दुचाकीने पेट घेतला.

त्यानंतर हातगाडी चालक हातगाडी घेऊन पळून गेला. यावेळी आजूबाजूचे नागरिक जमा झाले. आणि त्यांनी ही आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. यात दुचाकी जळाली आहे. या घटनेमुळे बेकायदा सुरू असलेल्या हातगाड्यांचा विषय ऐरणीवर आला आहे.

## लग्नाच्या पार्टीत जेवत असताना मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

लग्नाच्या पार्टीत जेवत असताना एका इसमास मारहाण झाल्याची घटना तालुक्यातील कोप्रोली येथे घडली आहे. अरविंदकुमार यादव (६२) हे एका सेवानिवृत्त व्यक्तीच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त कम्युनिटी हॉल रॉयल मेडॉस सोसायटी कोप्रोली येथे जेवत असताना आरोपी व्ही.के.मिश्रा यांनी त्यांच्याशी वाद घालून त्यांना शिवीगाळ करून लाथा बुक्क्याने जबरी मारहाण करून त्यांना जखमी केले. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**पनवेल : राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते खारघर भाजप सांस्कृतिक महोत्सवाच्या पोस्टरचे अनावरण रविवारी करण्यात आले तसेच मंत्रीमहोदयांना खारघर येथे होणाऱ्या या महोत्सवाचे आमंत्रण देण्यात आले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, विधान परिषद आमदार विक्रांत पाटील, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, सांस्कृतिक सेल उत्तर रायगड अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष चिन्मय समेळ उपस्थित होते.**

# शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त स्वस्तिका घोषचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

**पनवेल : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रतिष्ठित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिला नुकताच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि राज्यपाल सी.पी. राधाकृष्ण यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानित करण्यात आले असून पुरस्कार मिळाल्यानंतर सोमवारी (दि. २८) स्वस्तिका घोष हिने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट आशीर्वाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाचे अभिनंदन करून तिला पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.



आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वस्तिका घोष ही जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी कॉलेजची विद्यार्थिनी आहे. खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) बीएमएसचे शिक्षण घेत आहे. स्वस्तिकाने देशात व परदेशात झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले असून गेल्या दहा वर्षांपासून ती महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करीत आहे. स्वास्तिकाचे वडील संदीप घोष हे या खेळातील तिचे प्रशिक्षक असून टेबल टेनिससाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाला वेळोवेळी आर्थिक मदत करण्याबरोबरच प्रशिक्षणासाठी खारघर येथील विद्यालयात विशेष सोय केली आहे.

स्वस्तिकाने आपल्या खेळात सातत्य ठेवत एक एक टप्पा सर करत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी काम केले आहे तसेच पनवेलच्या स्वस्तिका घोषने शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळवून संपूर्ण पनवेलकरांचे नाव उज्ज्वल केले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तिच्या परिश्रमाचे कौतुक करून तिला पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील, जी.के. सुर्वे, विनोद नाईक, संदीप घोष उपस्थित होते.

# उरणमधील मुस्लिम बांधवांतर्फे दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील मुस्लिम समाज हा शांतताप्रिय व देशप्रेमी असून पूर्वीपासूनच समाज समता, बंधुता, एकता, सर्वधर्मसमभाव, समानता आदी मानवतेची मूल्ये जोपासत आला आहे. काश्मीर राज्यातील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ हुन अधिक निष्पाप भारतीय व्यक्तींचा मृत्यू झाला. सदर दहशतवादी हल्ल्यामुळे भारतातील नागरिकांमध्ये दहशतवादी विरोधात संतापाचे वातावरण निर्माण झाले असुन सर्वत्र निषेध, बैठका, लाँग मार्च, कॅण्डल मार्च काढले गेले.



रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात ही मुस्लिम बांधवांतर्फे दहशदवाद्यांचा निषेध करण्यात आला. रॅली काढून व पोलीस स्टेशनला निवेदन देऊन मुस्लिम समाजाने आपला संताप व्यक्त केला. उरण शहरातील मस्जिद मोहल्ला ते गांधी पुतळा, जरी मरी मंदिर बाझारपेठ, उरण पोलीस स्टेशन या मार्गावर हातात बॅनर घेऊन रॅली काढून निषेध करण्यात आला.

शेवटी उरण पोलीस ठाण्यात निवेदन देऊन पहलगाम दहशतवादी हल्ल्याचे कर्ते, त्याचे समर्थक आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या व्यक्तीना कायद्याच्या कठोर चौकटीत शिक्षा करावी आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

# सेवा हक्क दिनानिमित्ताने पनवेल महानगरपालिकेचे विविध कार्यक्रम

■ मुख्यालयात सेवा हक्क माहिती फलकाचे अनावरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या वतीने २८ एप्रिल रोजी सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयात सेवा हक्क दिनाची माहिती देणाऱ्या फलकाचे अनावरण आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते करण्यात आले तसेच यावेळी लोकसेवा सेवा हक्काबाबतची शपथ घेण्यात आली.

कार्यक्रमास महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर,मंगला माळवे, स्वरूप खारगे , मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, सहाय्यक नगररचनाकार केशव शिंदे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक अधिकारी डॉ.रूपाली माने, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य अग्निशामन अधिकारी प्रवीण बोडखे, उपअभियंता विलास चव्हाण, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सामान्य विभाग प्रमुख दशरथ भंडारी, महापालिकेचे सर्व विभाग प्रमुख ,कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी आयुक्त मंगेश चितळे म्हणाले, सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांना ताबडतोब सेवा द्याव्यात. महापालिकेच्यावतीने 'पनवेल कनेक्ट ॲप' लॉंच करण्यात आले असून या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना सुमारे ६२ सेवा दिल्या जात आहेत. विविध सेवांच्या माध्यमातून कारभार अधिकाधिक लोकाभिमुख, उत्तरदायी, पारदर्शक करण्याच्यादृष्टीने भर देण्यात येत असल्याचे सांगितले.




## संपादकीय

# उदात्तीकरण टाळणे योग्य

एनसीईआरटीच्या अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या इयत्ता सातवीच्या पाठ्यपुस्तकातून मुघल आणि दिल्लीतील तत्कालीन राजवटीचे पुन्हा पुन्हा येणारे संदर्भ कमी करण्यात आले आहेत. त्याऐवजी भारतीय राजवंश, पवित्र भूगोल, महाकुंभ, 'मेक इन इंडिया' व 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' यांसारख्या योजनांचा समावेश पाठ्यपुस्तकांमध्ये करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांवरील अभ्यासक्रमाचा बोजा काहिसा कमी करण्यासाठी हे बदल करण्यात आले असले तरी काही मंडळी या बदलांना राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**मुघलांविषयीचे संदर्भ एनसीईआरटी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने इयत्ता सातवीच्या पाठ्यपुस्तकातून काढून टाकल्याबद्दल काही राजकीय पक्षांनी व नेत्यांनी ओरड सुरू केली असून हा इतिहास पुसून टाकण्याचा प्रयत्न आहे अशी आवई ते उठवत आहेत. वास्तविक, नव्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांवरील अभ्यासक्रमाचा बोजा कमी करण्यासाठी काही प्रकरणे वगळण्यात आली आहेत. आता प्रसिद्ध झालेली पुस्तके हा अभ्यासक्रमाचा केवळ पहिला भाग असून भाग दोन येत्या काही महिन्यांत प्रकाशित होणे अपेक्षित आहे असे एनसीईआरटीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. तर निव्वळ पुन्हा पुन्हा येणारे उल्लेख वगळले आहेत असा खुलासा केंद्रीय मंत्री व पश्चिम बंगालचे भाजप प्रदेशाध्यक्ष सुकांतो मजुमदार यांनी केला आहे. मुघल कालीन संदर्भांचा समावेश शालेय अभ्यासक्रमात असायला कुणाचीच हरकत नाही. परंतु मुघलांचे उदात्तीकरण करताना आपण इतिहासातील अन्य काळांकडे दुर्लक्ष करतो आहोत असे अर्थातच होता कामा नये असे प्रतिपादनही त्यांनी केले. एनसीईआरटीने आता नेमके तेच केलेले दिसते आहे. भारताच्या गौरवशाली इतिहासात मुघलांच्या आधी अनेक उत्तम राज्यकारभार करणारे राजवंश होऊन गेले आहेत. तो भारताच्या इतिहासातील एक सुवर्ण कालखंड होता. त्याविषयी आपल्या विद्यार्थ्यांना काहीच माहीत नाही असे कसे चालू शकेल? उलट मुघलांचा कालखंड हा आपल्या इतिहासातील एक अंध:कारमय कालखंड होता. त्या काळात हिंदूंवर मुघलांकडून जे अत्याचार झाले, मंदिरे पाडली गेली त्यांचे संदर्भ अभ्यासक्रमात फारसे येऊ नयेत याची दक्षता पश्चिम बंगालसारख्या राज्यातील कम्युनिस्ट राजवटीने यापूर्वी घेतली आहे. यापूर्वी २०२२-२३ मध्ये करोना साथीच्या काळातही तुघलक, खिलजी आणि लोदी यांसारख्या मुघल राजवंशांचे तपशीलवार वर्णन आणि मुघल सम्राटांच्या कामगिरीविषयीचे तपशील एनसीईआरटीने वगळले होते. तेव्हाही काही राजकीय पक्षांनी त्याविरोधात ओरड केली होती. मुघलांचा इतिहास का वगळला, ते आपल्या देशातील एकेकाळचे राज्यकर्ते आहेत असे या टीका करणाऱ्या पक्षांचे म्हणणे होते. नक्षलींविषयींचे उतारे वगळल्याबद्दलही तेव्हा आक्षेप घेण्यात आला होता. केरळच्या तत्कालीन कम्युनिस्ट सरकारने तर आपण पुरवणी पुस्तक काढून वगळलेले सर्व भाग विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करू अशी धमकी तेव्हा दिली होती. आता नवीन पाठ्यपुस्तकात मुघलांविषयीचे तपशील पूर्णपणे काढून टाकण्यात आले आहेत असे या मंडळींचे म्हणणे असून त्यामुळे त्यांचे पित्त खवळले आहे असे दिसते. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात औरंगजेबाचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न काही मंडळींनी केला होता. अशाप्रकारचे मुघलांचे उदात्तीकरण शालेय अभ्यासक्रमातून होऊ नये याची खबरदारी घेतली जात असेल तर त्यात गैर ते काय? अशा उदात्तीकरणातून निव्वळ वादंग निर्माण होतो. त्यामुळे उलट ते टाळण्याची खबरदारी घेणेच योग्य नव्हे का?**

# उद्योगाला बळकटी देणारी संजीवनी : वेव्हज शिखर परिषद

माध्यम आणि मनोरंजन उद्योग सध्या मोठ्या परिवर्तनाच्या उंबरठ्यावर आहे. 'WAVES २०२५' ही परिषद नव्या कल्पनांना दिशा देऊन, भारताला जागतिक ME सुपरपॉवर बनवण्याचा पाया रचणार आहे. सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक भागीदारी यांचा मेळ घालून, भारताला 'ग्लोबल कंटेंट डेस्टिनेशन' बनवण्याचे स्वप्न या मंचाद्वारे प्रत्यक्षात उतरणार आहे. पंतप्रधान, केंद्रीय मंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत होणारी ही परिषद भारताच्या सृजनशील भविष्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा देणारी ठरणार आहे.

देशातील माध्यम व मनोरंजन (Media Entertainment) क्षेत्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण ठरणाऱ्या 'WAVES २०२५' या जागतिक परिषदेस मुंबईत भव्य सुरुवात होत आहे. १ ते ४ मेदरम्यान होणारी ही परिषद भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून माध्यम आणि मनोरंजन उद्योगाच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

१ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जिओ वर्ल्ड सेंटर, मुंबई येथे या ऐतिहासिक परिषदेचे उद्घाटन होणार आहे. या वेळी केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.




बॉलीवूड, टीव्ही आणि ओटीटी इंडस्ट्री यांचे केंद्रस्थान असलेली मुंबई भारताच्या मनोरंजन क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिली आहे. आता याच मुंबईला आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावर 'क्रिएटर हब' म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न 'WAVES २०२५'च्या माध्यमातून होतो आहे. ऑस्कर, कान्स आणि दावोससारख्या जागतिक परिषदेच्या धर्तीवर प्रथमच भारतात अशी परिषद आयोजित होत असून, जगभरातील १००पेक्षा अधिक देशांतील प्रतिनिधी यात सहभागी होणार आहेत.

'WAVES २०२५' ही परिषद केवळ भारतातीलच नव्हे तर जागतिक माध्यम व मनोरंजन (ME) उद्योगाला एकत्र आणणारा, नवसृजनास चालना देणारा आणि गुंतवणुकीसाठी दरवाजे उघडणारा एक महत्त्वाचा मंच आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, तंत्रज्ञानातील कौशल्य आणि प्रतिभेचा संगम या परिषदेच्या केंद्रस्थानी असणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी WAVES २०२५ला भारताच्या क्रिएटिव्ह शक्तीचे जागतिक प्रदर्शन म्हणून संबोधले आहे. या परिषदेमुळे भारताच्या मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळेल, असे त्यांनी म्हटले आहे.

WAVES २०२५ परिषदेत जगभरातून १००पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून भारतातील क्रिएटिव्ह इकॉनॉमीला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे. भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर ओटीटी, निमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज् परिषदेचे आयोजन होत असून या परिषदेत चर्चासत्रे, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहेत.

WAVES २०२५ ही परिषद केवळ एक कार्यक्रम नसून भारताच्या क्रिएटिव्ह अर्थव्यवस्थेच्या जागतिक मंचावर उभारणीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या परिषदेमुळे भारतीय कलाकार, स्टार्टअप्स, आणि उद्योगांना आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली कला, नवकल्पना, आणि व्यवसाय सादर करण्याची संधी मिळेल. या परिषदेमुळे भारताच्या मीडिया आणि मनोरंजन क्षेत्राला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळेल आणि भारताला क्रिएटिव्ह हब म्हणून प्रतिष्ठा मिळेल.

**संकलन : जिल्हा माहिती अधिकारी रायगड**

# आज आंतरराष्ट्रीय नृत्य दिन; असा आहे इतिहास...

जगभरात २९ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जातो. महान नृत्यांगना जीन-जॉर्जेस नवारेच्या वाढदिवसानिमित्त हा उत्सव साजरा करण्यात आला आहे.

नृत्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते भावना व्यक्त करण्याचेही एक साधन आहे. मग ती एखाद्याबद्दलची नाराजी असो किंवा एखादी गोष्ट साध्य करण्याचा उत्साह आणि उत्सव असो, तुमच्या प्रत्येक भावना इतरांपर्यंत पोहचवण्यासाठी तुम्ही नृत्याची मदत घेऊ शकता. इतकेच नव्हे तर नृत्याच्या माध्यमातून समाजात जनजागृती करण्याचे कामही वर्षानुवर्षे केले जात आहे. चला तर मग जाणून घेऊया काय आहे आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाचा इतिहास आणि त्याचे महत्त्व काय आहे.



२९ एप्रिल १९८२ रोजी, UNESCO च्या इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूटच्या आंतरराष्ट्रीय नृत्य समितीने महान नृत्यांगना जीन-जॉर्जेस नवारेच्या वाढदिवसानिमित्त हा दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस जगभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आम्ही तुम्हाला सांगतो की, नवेरा ही फ्रान्समधील एक निपुण बॅले डान्सर होती, ज्याने नृत्यावर 'लेटर्स ऑन द डान्स' नावाचे पुस्तक लिहिले ज्यामध्ये नृत्याशी संबंधित सर्व गोष्टी आहेत. हे वाचून कोणीही नृत्य शिकू शकेल.

आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाचे उद्दिष्ट केवळ जगातील सर्व नर्तकांचे प्रोत्साहन वाढवणे हा नाही तर या सर्व नृत्य प्रकारांबद्दल लोकांमध्ये जागरुकता पसरवणे हा आहे, ज्यामध्ये जगातील मोठे नेते आणि सरकारे देखील आहेत. सहभागी. नृत्य हा स्वतः चा आनंद आहे आणि तो इतरांनाही वाटून घ्यायचा हाही त्याचा उद्देश आहे.

दरवर्षी २९ एप्रिल हा दिवस आंतराराष्ट्रीय नृत्य दिवस म्हणून साजरा केला जातो. बॅले नृत्याचे आद्य संस्थापक जीन-जॉर्जेस नोव्हेर (इ.स.१७२७-१८१०) यांचा हा जन्मदिवस. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जावा असे आंतरराष्ट्रीय नाट्यसंस्था (इंटरनॅशनल थिएटर इन्स्टिट्यूशन-ITI) ने ठरवले. ही संस्था युनेस्कोची भागीदार असलेली स्वतंत्र संस्था आहे. तिच्या आदेशावरून इ.स. १९८२ सालापासून हा दिवस साजरा करण्यात येत आहे. या दिवशी, जगप्रसिद्ध आणि त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट नृत्य कलावंला जागतिक संदेश देण्यासाठी आमंत्रित केले जाते.

नृत्य कलेला आणि नृत्य कलावंताला जगमान्यता मिळावी, या कलेचा उत्कर्ष आणि अधिकाधिक प्रसार व्हावा आणि तिला राजाश्रय मिळावा हा उद्देश, आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा करण्यामागे आहे.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# तुम्हालाही व्हॉट्सअपवर Hi, Helloचा मेसेज आलाय का?

तुम्ही कोणत्याही वेबसाईटवर, अॅपवर तुमचा मोबाईल नंबर लॉगईन केलेला असेल आणि जर त्यांचा डेटा हॅक झाला असेल तर तुमचा डेटा डार्क वेबवर असतो. त्यात तुमचा मोबाईल नंबर, नाव, मेल आयडी, जन्म दिनांक, पत्ता आणि पासवर्डही असतो.




अनेकांना व्हॉट्सअपवर सकाळी, दुपारी किंवा सायंकाळी कधीही हाय, हॅलो असे मेसेज येतात. हे अनोळखी नंबर असतात, त्यावर एखादे मुलीचे गोंडस नाव दिलेले असते. एखादा रिव्ह्यू किंवा लाईक किंवा अन्य काही तरी करा तुम्हाला पहिल्या टास्कचे १५० रुपये मिळतील असे सांगितले जाते. ही टास्क केल्यावर तुम्हाला ते पैसे तुमच्या अकाऊंटमध्ये मिळतात. पण पुढे मोठा घोळ होतो.

तुम्ही कोणत्याही वेबसाईटवर, अॅपवर तुमचा मोबाईल नंबर लॉगईन केलेला असेल आणि जर त्यांचा डेटा हॅक झाला असेल तर तुमचा डेटा डार्क वेबवर असतो. त्यात तुमचा मोबाईल नंबर, नाव, मेल आयडी, जन्म दिनांक, पत्ता आणि पासवर्डही असतो. यामुळे हे लोक तुमच्यापर्यंत पोहोचू शकतात. ते तुम्हाला मेसेज करतात आणि प्रलोभन दाखवितात.

सुरुवातीला तुम्हाला १५० रुपये सांगितल्याप्रमाणे देतात आणि मग पुढे तुमच्यासोबत स्कॅम होतो व तुमचे अकाऊंट धुपले जाते. घरात बसून पैसे मिळतात, फक्त काय एक व्हिडीओ तर पहायचा आहे, एखाद्या कंपनीला ती चांगली आहे, असा रिव्ह्यू तर द्यायचा आहे असे म्हणून तुम्ही तुमचे पैसे धोक्यात टाकता. दिवसाला तुम्हाला १०००, २००० रुपये मिळतील अशी आशा दाखविली जाते, त्यात तुम्ही फसता आणि हाती असलेले पैसेही गमावून बसता.

यामुळे या रिव्हू देण्याच्या किंवा व्हिडीओ पाहण्याच्या मेसेजना रिप्लाय देऊ नका. तो नंबर ब्लॉक करून टाका. म्हणजे तुमचे अकाऊंट सेफ राहिल. तसेच त्या नंबरवरून आलेली इमेज किंवा कोणतीही फाईल डाऊनलोड करू नका. असे केल्याने तुमच्या मोबाईलमध्ये ते मालवेअर इन्सटॉल करण्यात यशस्वी ठरतात आणि नंतर तुम्हाला ते फसवू शकतात. सध्या सर्वांचे आयुष्य त्या मोबाईलमध्ये असते. गोपनिय डॉक्युमेंट, अकाऊंट डिटेल्स, खासगी मेसेज, युपीआय अॅप्स आदी गोष्टी त्या मोबाईलमध्ये असतात. यामुळे तुमचा मोबाईल खूप महत्वाचा असतो. एखादा अँटीव्हायरस तुम्ही मोबाईलमध्ये टाकू शकता. जो तुम्हाला वर्षाला २०० रुपयांनाही मिळतो.

# सुप्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा

राजा रवि वर्मा हे भारताच्या त्रावणकोरच्या राजघराण्यातील एक चित्रकार होते. त्यांनी भारतीय साहित्य आणि संस्कृतीतील पात्रांची रंगीत चित्रे काढली. राजा रवि वर्मा यांनी काढलेल्या चित्रांनंतरच हिंदूंना आपले देव कसे दिसत असावेत ते समजले. भारतातील परंपरागत हिंदू महाकाव्ये आणि पुराणांतील कथा यांवर रवि वर्मा यांनी काढलेली चित्रे आजही प्रमाण मानली जातात.

राजा रवि वर्मा यांचा जन्म २९ एप्रिल १८४८ रोजी केरळमधील कोईल तंपुरन येतील किलिमनूर राजवाड्यात झाला. त्यांचे वडील मोठे विद्वान व आई कवयित्री होती. राजा रवि वर्मा यांना सी.गोडा वर्मा नावाचा भाऊ व मंगला नावाची बहीण होती. त्यांच्या बालपणीच त्यांना महाराज अलियम् तिरुनल या त्यांच्या नातलग राजाचा आश्रय मिळाला. रवि वर्मा यांचे काका उत्तम चित्रकार होते. तो चित्रकलेचा वारसा पुतण्यात उतरला. याशिवाय तिरुवनंतपुरमच्या राजदरबारी असणारे इंग्रज चित्रकार थी ओडेर जेन्सन, रामस्वामी नायडू यांच्या चित्रकारितेचा प्रभाव त्यांच्यावर पडला. त्रावणकोर महाराजांच्या प्रोत्साहनामुळे त्याला अधिकच प्रेरणा मिळाली. ते त्रावणकोरचे राजचित्रकार बनले.

१८७३ मध्ये मद्रास येथील चित्रकलेच्या स्पर्धेत रवि वर्मा यांनी सुवर्णपदक मिळवले. महाराजांच्या दरबारात असणार्या इटालियन



### निमित्त

तैलचित्रांकडे पाहून त्यांनी तैलचित्रे काढण्याचे ठरवले. राजा रवि वर्मा यांच्या चित्रांत एक सुंदर, प्रमाणबद्ध व सौंदर्यवती साडी नेसलेली स्त्री असते. त्यांचा स्टुडिओ महाराष्ट्रात लोणावळ्याला होता. तेव्हा दिसलेल्या मराठी स्त्रियांकडे पाहून त्यांनी तशाच स्त्रिया चित्रांत रंगवल्या. राजा रवि वर्मा यांनी चित्रांतील विविध विषयांसाठी भारतभर प्रवास केला. त्याचे 'दुष्यंत व शकुन्तला', 'नल व दमयंती, या विषयावरील चित्रे प्रसिद्ध आहेत. त्यांच्या चित्रांनी भारतीयांना त्यांच्या धर्मग्रंथांतील दृश्ये डोळ्यासमोर साकार झाली.

ही त्यांची चित्रे सर्व भारतभर प्रसिद्ध झाली. आधुनिक भारतीय वास्तववादी चित्रकलेचा जनक म्हणून राजा रवि वर्मा यांचे नाव घेतले जाते. युरोपियन चित्रकारांप्रमाणे 'कमिशन पोट्रेट' काढणारे ते पहिले भारतीय चित्रकार. त्यांच्या चित्रकलेवर पाश्चात्त्यांचा पगडा असला तरी त्यांची चित्रे मात्र अस्सल भारतीय होती. रामायण-महाभारतातील प्रसंग, विश्वामित्र-मेनका, दुष्यंत-शकुंतला, उर्वशी-पुरुरवा अशी एकापेक्षा एक सरस चित्रे आपल्या वास्तववादी शैलीच्या कलाकृतीतून चितारली आहेत. आपली चित्रे छापण्यासाठी त्यांनी लोणावळ्याजवळील मळवली येथे शिळा (प्रेस) छापखाना उभारला. या छापखान्यातून हजारो देवदेवतांची चित्रे सार्या भारतभर पूजली जाऊ लागली. देवतांना मानवी चेहरे देण्याचे काम रवि वर्मा यांनी केले.

आपल्या चित्रांतून भारतीय संस्कृतीचा ठसा जगात पोहचविणार्या रवि वर्मा यांना अनेक मानसन्मान मिळाले. शिकागोच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात स्थान मिळवणारे ते एकमेव. सातव्या एडवर्डने 'कैसर-ए-हिंद' हा पुरस्कार देऊन त्यांना गौरविले होते. त्या काळात देशविदेशातील राजांचे राजवाडे राजा रवि वर्मा यांच्या चित्रांच्या दालनांनी सजले होते. त्यांच्या चित्रातून मानवी स्वभावाच्या भावना, छटा सहजसुंदरतेने दर्शविल्या. अशा या महान चित्रकाराचे २ ऑक्टोबर १९०६ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

### बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# घामाची दुर्गंधी दूर करण्याचे काही उपाय

उन्हाळा सुरू झाला की, घामामुळे लोक हैराण होतात. सोबतच घामाच्या दुर्गंधीमुळे त्यांना आणि इतरांनाही त्रास होते. अशात चार चौघात जाण्यासही भिती वाटते. त्यामुळे घामाच्या दुर्गंधीची समस्या दूर करण्यासाठी आम्ही काही घरगुती उपाय तुम्हाला सांगणार आहोत...



आधी जाणून घेऊया घामाच्या दुर्गंधीची कारणे. फार जास्त मसालेदार पदार्थ खाल्ल्यानेही शरीराची दुर्गंधी येऊ लागते. त्यामुळे उन्हाळ्यात जास्त मसालेदार पदार्थ खाणे टाळावेत. तणाव असल्यावर शरीरातून घाम अधिक निघतो. यादरम्यान शरीरात कॉर्टिसोल हार्मोन अधिक रिलीज होतात. ज्यामुळे असं होतं. जास्त प्रमाणात निघालेला घाम जेव्हा बॅक्टेरियाच्या संपर्कात येतो तेव्हा दुर्गंधी येऊ लागते. जर तुम्ही फार जास्त औषधे घेत असाल तर याचा प्रभाव तुमच्या शरीरावरही होतो. औषधांमधील रासायनिक तत्व शरीराच्या गंधाला प्रभावित करतात. अशात घाम आणि शरीराचा गंध मिळून दुर्गंधी निर्माण होते.

आंघोळीच्या पाण्यात काही थेंब गुलाबजल टाका. गुलाबजल एक नॅचरल कुलर आहे. यामुळे तुम्हाला फ्रेश वाटेल. तसेच तुम्ही घामाची दुर्गंधी दूर करण्यासाठी अंडरआर्ममध्ये बटाट्याच्या स्लाइसने रब करा. यानेही दुर्गंधी जाते.

आंघोळीच्या पाण्यात थोडी तुरटी फिरवा किंवा पदीन्याची पाने बारीक करून टाका. यानेही घामाची दुर्गंधी दूर होण्यास मदत मिळते.

बेकिंग सोड्याचा तुम्ही टॅल्कम पावडरच्या रूपात वापर करू शकता. बेकिंग सोडा एक पाण्यात मिक्स करा आणि हे पाणी, काखेत, पायांच्या बोटांच्या मधे लावा. यासाठी एक कप पाण्यात दोन चमचे बेकिंग सोडा टाका. कपडे घालण्याआधी हे मिश्रण घाम येणाऱ्या भागांवर लावा.

पाणी उकडून घ्या आणि त्यात ग्रीन टी ची काही पाने टाका. हे पाणी थंड झालं तर कॉटनच्या मदतीने ते घाम येणाऱ्या भागात लावा. चहा त्वचा शुष्क आणि गंधमुक्त ठेवण्यास मदत करते. याचा वापर तुम्ही आठवड्यातून दोनदा करा.

एज कप ताजा टोमॅटोचा रस घ्या आणि तो एक बकेट पाण्यात टाका. या पाण्याने आंघोळ करा. टोमॅटोमधील अँटीसेप्टीक गुण कोणत्याही प्रकारचा गंध निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियाला नष्ट करण्यास मदत करतो.

लिंबू त्वचेची पीएच लेव्हर संतुलित करण्यास मदत करतं. दोन मोठे चमचे कॉर्नस्टार्च आणि लिंबाचा रस घेऊन पेस्ट तयार करा. ही पेस्ट काखेत लावा आणि १० मिनिटांनी ती स्वच्छ करा.

# मेहनतीशिवाय कोणतेही फळ मिळत नाही

## मंत्री भरत गोगावलेंचे प्रतिपादन; ऋषिकेश मालोरेचा सत्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

ऋषिकेश मालोरे हा ग्रामीण भागात राहणारा असून त्याचे वडील वकिली हा व्यवसाय करतात. आई वडिलांनी केलेले कष्ट व ऋषिकेश याची मेहनत यामुळेच त्याला मानाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त झाला आहे. आपला रायगडकरांसाठी अभिमानाची बाब आहे. पुरस्कार हे सहजासहजी मिळत नसतात. त्यासाठी अथक परिश्रम करावे, असे प्रतिपादन रोहयो, फलोत्पादन व खारजमीन विकासमंत्री भरत गोगावले यांनी न्हावे येथील शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त ऋषिकेश मालोरे यांच्या सत्कार समारंभात केले.

या कार्यक्रमाला शिवसेना संपर्कप्रमुख अरुण चाळके, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, समाजसेवक सिताराम उभारे, ॲड. विनोद घायाळ, सुजित शिंदे, राजेश कदम, ए.पी.आय विजय सुर्वे, प्रताप घोसाळकर, डॉ. वाझ, महिला तालुकाप्रमुख अरुणा वाघमारे, बार असोसिएशन अध्यक्ष ॲड. मोहन मेथा, न्हावे ग्रामस्थ, मालोरे कुटुंब आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र सरकारद्वारे सन २०२३–२४चा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ऋषिकेश मालोरे याला मिळाला. त्याबद्दल न्हावे ग्रामस्थांतर्फे भव्य मिरवणूक व सत्कार दि. २६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता. या वेळी ना. गोगावले यांनी मेहनत केल्यानंतर काय मिळत याचे उत्तम उदाहरण म्हणजे ऋषिकेश. मेहनतीशिवाय कोणतेही फळ मिळत नाही. ऋषिकेशनी आता देशपातळीवर आपल्या कामगिरीतून नावलौकिक मिळवावे. त्यासाठी लागेल ते सहकार्य आमच्यातर्फे केले जाईल. शासनाच्या माध्यमातून लागणारी मदतसुद्धा केली जाईल, असे आश्वासन यावेळी गोगावले यांनी दिले.



# श्रीवर्धन समुद्रकिनारी आढळला अनोळखी व्यक्तीचा मृतदेह

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन समुद्रकिनारी एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह समुद्राच्या पाण्याबरोबर वाहून येऊन वाळूमध्ये रुतलेल्या अवस्थेत आढळून आला आहे.

सदर मृतदेह हा ५५ ते ६० वर्ष वयापर्यंतच्या इसमाचा असल्याचे दिसून येत आहे. मृतदेहाच्या अंगामध्ये फुल अंडरवेअर व फिक्कट गुलाबी रंगाचा शर्ट असल्याचे दिसून येत आहे. त्याने केस पांढरे झालेले असल्याने त्याला मेहंदी लावलेली दिसून येत आहे. मृतदेह मिळाल्याची माहिती मिळताच श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे कर्मचारी व अधिकारी त्या ठिकाणी दाखल झाले आहेत.

सदरचा मृतदेह पोलिसांनी पंचनामा करून ताब्यात घेतला असून शव विच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन या ठिकाणी नेण्यात आला आहे. सदर अज्ञात व्यक्तीची अद्यापपर्यंत ओळख पटलेली नाही. सदरचा अनोळखी इसम हा बोटीवरील खलाशी असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

पहाटेच्या वेळी समुद्रात पडल्याने त्याचा मृत्यू झाला असून कालच अमावस्या झाली असल्याने समुद्राला मोठी भरती आली होती. त्यामुळे खालचा जीवना कोळीवाडा या ठिकाणी हा मृतदेह आढळून आला. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक लहाने हे करीत आहेत.

# निळज गावात खडकाळ जमिनीतून वाहू लागले पाण्याचे झरे



**माणगाव : बातमीदार**

माणगांव तालुक्यातील इंदापूर विभागातील निळज हे गाव मुंबई व गोवा हायवे नजीक असून डोंगर माथ्यावर उंचावर वसलेले आहे. हे पाणी टंचाई ग्रस्त गाव आहे. या गावाच्या खडकाळ जमीनवर गेली चार ते पाच दिवसा पासून पाण्याचे झरे वाहू लागल्याने निळज ग्रामस्थ हे झरे पाहून आश्चर्य चकित झाले आहेत. हे वाहणारे झरे पाहण्यासाठी येथील ग्रामस्थांनी गर्दी केली आहे.

काही ग्रामस्थांनी बोलताना सांगितले की, या खडकाळ भागात आमच्या पिढ्यान पिढ्या होऊन गेल्या. उन्हाळ्यात एप्रिल मध्ये या भागात कधीच पाणी बघायला भेटले नाही ते या वर्षी अचानक पणे कसे काय पाणी वाहू लागले? हा ग्रामस्थांना मोठा प्रश्न पडला आहे. या गावात जलजीवन मिशन ही योजना या गांवासाठी खालून तलावातून नेली असून या तलावात देखील एप्रिल, मे महिन्यात पाणी कमी होताना दिसत असून अचानक पणे डोंगर माथ्यावर उंचावर निळज बौध्दवाडी आणि आदिवासी वाडी यांच्या मध्येभागी खडकाळ भागावर चार ते पाच दिवसा पूर्वी निसर्गाचा चमत्कार झाला असून या गावात पाण्याचे झरे वाहू लागल्याने या भागातील नागरी वर्ग हे या पाण्याचे झरे बघण्यासाठी मोठी गर्दी करू लागले आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल एलटीपीएस इन्फ्रा प्रा. लि. (LTPS Infra Pvt. Ltd) तर्फे भागीदार **१) श्री. लहु लक्ष्मण पाटील, २) श्री. प्रशांत लहु पाटील यांनी कै. किसन जाना पारगांवकर (मयत) तर्फे कायदेशिर वारस १) श्री. सुनिल किसन पारगांवकर, २) अनिल किसन पारगांवकर, ३) श्री. मिलिंद किसन पारगांवकर, रा. बेलापूर, उरण रोड, गाव–तरघर, उलवे, ता. पनवेल, जि.रायगड** यांचे भाडेपट्टा मालकी हक्काचा खालील वर्णनाचा भुखंड त्यांचेकडुन त्रिपक्षीय भाडेपट्टा कराराने आणि इतर अनुशंगिक दस्तऐवजाने आपले लाभात कायमस्वरूपी भाडेपट्टा मालकी हक्काने हस्तांतरीत करून घेण्याचे योजले आहे.

**भुखंडाचे वर्णन**

| मौजे / नोड | भुखंड क्रमांक | सेक्टर क्रमांक | क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|
| पुष्पक वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड | ३२ | आर–४ | १८० चौ.मी. |

वर नमूद भुखंडास अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न–वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद भुखंडाचे हस्तांतरण त्रिपक्षीय भाडेपट्टा करार आणि इतर अनुशंगिक दस्तऐवजाद्वारे कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक : २८/०४/२०२५
ठिकाण : पनवेल

**सही/–**
**शरद रामचंद्र जाधव, वकील**
(बी.कॉम. एलएल.बी.)
नोंदणी क्र. एम् ए एच् – ३५८६ / २००८

कार्यालयीन पत्ता : कार्यालय क्र. ००१, तळमजला, रॉयल प्राईड, भुखंड क्र. ११३, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड–४१०२०६.

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड

### जाहीर निविदा सूचना सन २०२५–२०२६

पनवेल महानगरपालिकेस सन २०२५–२६ या वित्तिय वर्षाकरिता निविदापत्रकांत नमुद केलेनुसार, **महिला व बालकल्याण विभागातर्फे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात महिला सुरक्षा जनजागृती मोहिमेचे आयोजन करणेबाबत** पात्र व इच्छुक संस्था/नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्या कडून सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.१७४/१७८/२०२५
दि. २८/४/२०२५

**सही/–**
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

## महावितरण — ई निविदा जाहिर सुचना

खालील कामांकरीता नामांकित आणि पंजीकृत ठेकेदारांकडून ई.निविदा बोलाविण्यांत येत आहे. निविदेचा तपशिल खाली देण्यांत येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचा तपशिल | निविदा रक्कम/ निविदा अनामत /निविदा मुल्य | निविदा विक्री/ खरेदी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | काअ/पनवेल ग्रा. /तां./निविदा .०६ /२०२५.२६ | पनवेल ग्रा. विभागाअंतर्गत २२/३३ केव्ही मिटरींग टाईप करंट ट्रान्सफॉर्मर पोटॅनशिअल ट्रान्सफॉर्मर आणि सबस्टेशन टाईप करंट ट्रान्सफॉर्मर पोटॅनशिअल ट्रान्सफॉर्मर दुरूस्त करणेबाबतचा ठेका. | रू. १०.०० लाख रू. १०,०००/. रू. ११८०/. | २४.०४.२०२५ पासून ०८.०५.२०२५ पर्यंत |
| २ | काअ/पनवेल ग्रा. /तां./निविदा .०५ /२०२५.२६ | पनवेल ग्रा. विभागाअंतर्गत महाराष्ट्रातील विविध स्टोर्स मधुन प्राप्त झालेले मटेरियल आणि इकिविपमेंट ९ मिटर टन पर्यंत ट्रान्सपोटेशन व मटेरियल हॉडलिंग करणे बाबतचा ठेका. | रू. ५.०० लाख रू. ५०००/. रू. ११८०/. | २४.०४.२०२५ पासून ०८.०५.२०२५ पर्यंत |

अधिक माहिती साठी कार्यकारी अधियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.पनवेल (ग्रा) विभाग, भिंगारी, पनवेल, जि. रायगड यांच्याशी संपर्क साधावा.
संपर्क अधिकारी सौ.कोमल सुपेकर मो.नं.९०२९१६२७८१

**कार्यकारी अभियंता,**
**म.रा.वि.वि.कं.मर्या.पनवेल (ग्रा) विभाग**

**नमुना – ७ अ**

**(कलम १९ ब (६) पहा)**

**संपादित जमिनीतील हितसंबंधाबाबत जमीन मालकांचे किंवा हितसंबंधित व्यक्तींचे अर्ज मागविण्यासाठी जाहीर नोटीस**

ज्याअर्थी, राज्य शासनाने, शासकीय अधिसूचना, क्रमांक खाक्षेस–२०२५/प्र.क्र.५०/भाग–२ / उरण / रस्ते–८, दिनांक १२ मार्च, २०२५ अन्वये महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट–कलम (१) अन्वये रेवस रेड्डी सागरी महामार्ग म्हणून (महामार्ग (विशेष) क्र.५) या महामार्गाचे बांधकाम करणे या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी क्षेत्र अधिसूचित करण्यासाठीच्या संपादनाच्या घोषणेची अधिसूचना प्रसिध्द केली आहे;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १९ ब च्या पोट–कलम (६) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकृत अधिकारी, याद्वारे, खालील निर्देश देत आहे.

(एक) जमीन मालकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना अनुसूचींमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीतील हितसंबंधाचे दावा सांगणारे अर्ज मागवित आहे.

(दोन) ज्यांच्या जमिनीचा संपादनामध्ये समावेश करण्यात आला आहे त्या जमीन मालकांनी किंवा हितसंबंधित व्यक्तींनी अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीतील हितसंबंधाचे स्वरुप आणि त्यासंबंधातील भरपाईवर सांगितल्या जाणाऱ्या त्यांच्या दाव्याची रक्कम व तपशील वगैरे बाबतचे अर्ज ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाचे आत उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल, जुना ठाणानाका रोड, पनवेल, पिन नं. ४१०२०६ येथे कार्यालयीन वेळेत दाखल करावेत. अर्जासोबत अर्जदार हे हितसंबंधित असल्याचे पुरावे व अर्जात उपस्थित केलेल्या मुद्दयाबद्दलचे सबळ कागदोपत्री पुरावे लावावे अन्यथा सदरचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही व त्यासाठी वाढीव मुदत दिली जाणार नाही.

या मुदतीनंतर मी हितसंबंधित आहे व निवाडयातील लोकांना भरपाई रक्कम देऊ नये अशा स्वरुपाचे अर्ज, आरटीएस अपिल व टेनन्सी अपिल दाखल करता येणार नाही.

सदर दाव्यांची गावनिहाय सुनावणी पुढे नमुद तारीख व वेळी लावण्यात आली आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | सुनावणीची तारीख | सुनावणीची वेळ सकाळी/दुपारी |
|---|---|---|---|
| १ | चाणजे, ता. उरण | १०/०६/२०२५ | ११.०० वा. |

महामार्गाचे बांधकाम करणे यासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत ही महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये व प्राधिकृत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत जमीन मालकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे आणि तसेच या प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधित व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हितसंबंधाचे दावा सांगणाऱ्या अर्जाची चौकशी प्राधिकृत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल यांचेमार्फत करण्यात येईल आणि संबंधित अर्जदारास त्याच्या अर्जाच्या समर्थनात तोंडी वा कागदोपत्री पुरावा सादर करण्यासाठी जातीने किंवा वकीलामार्फत किंवा कोणत्याही कायदेशीर व्यक्तीमार्फत प्राधिकृत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल यांचेसमोर सुनावणीच्या नमूद तारखेस व वेळेस उपस्थित राहण्याची मुभा असेल.

ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून जमीन मालकांकडून किंवा हितसंबंधित व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हितसंबंधाचे दावा सांगणाऱ्या अर्जाची चौकशी प्राधिकृत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पनवेल उपविभाग पनवेल यांचेमार्फत करण्यात येईल आणि संबंधित अर्जदारास त्याच्या अर्जांच्या समर्थनात तोंडी वा कागदोपत्री पुरावा सादर करण्यासाठी जातीने किंवा वकीलामार्फत प्राधिकृत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल यांचेसमोर सुनावणीच्या नमुद तारखेस व वेळेस उपस्थित राहण्याची मुभा असेल.

**अनुसूची**
**संपादीत जमिनीचा तपशिल**

| गांव–चाणजे, ता. उरण, जि. रायगड | | | गांव–चाणजे, ता. उरण, जि. रायगड | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) | अ.क्र. | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
| १ | १८ | ०–७६–८२ | ३९ | ३३७/५ | ०–०६–४२ |
| २ | १७ | ०–६८–१४ | ४० | ३३७/६ | ०–०४–२३ |
| ३ | २२/१/अ | १–५७–२१ | ४१ | ३३८/१ | ०–०५–३९ |
| ४ | २७ | ०–७९–३१ | ४२ | ३३८/२ | ०–२६–२२ |
| ५ | ३१ | ०–१७–२५ | ४३ | ३३८/३ | ०–००–९८ |
| ६ | ३२ | ०–४७–२८ | ४४ | ३३८/४ | ०–०७–३० |
| ७ | ३३ | ०–०२–२१ | ४५ | ३३८/५ | ०–००–९४ |
| ८ | ९७ | ०–६२–८७ | ४६ | ३३८/६ | ०–१०–६८ |
| ९ | ३६५/१ | ०–१७–५४ | ४७ | ३०३/३ | ०–१७–४९ |
| १० | ३६५/२ | ०–२९–४९ | | | |
| ११ | ३६९/१/अ/१ | ०–२१–४१ | ४८ | ३०५/५ | ०–२८–२८ |
| | ३६९/१/अ/२ | | ४९ | ३०३/१ | ०–०९–४६ |
| १२ | ३६९/२ | ०–२७–८४ | ५० | ३०३/२ | ०–१०–०७ |
| १३ | ३६९/३ | ०–००–०६ | ५१ | ३०७/१ | ०–०४–१९ |
| १४ | ३६६/१ | ०–१०–४६ | | ३०६/१ | |
| १५ | ३६६/६ | ०–१४–६१ | | ३०६/२ | |
| १६ | ३६६/५ | ०–००–९६ | ५२ | ३०६/३ | ०–३९–४९ |
| १७ | ३६६/४ | ०–०७–७० | | ३०६/४ | |
| १८ | ३६६/२ | ०–०२–३० | | ३०६/५ | |
| १९ | ३६७/१ | ०–०१–१२ | ५३ | ३०४/२ | ०–०७–९१ |
| २० | ३६७/२ | ०–०३–३४ | ५४ | ३०४/३ | ०–०१–८१ |
| २१ | ३४९ | ०–०७–६४ | ५५ | ३०५/१ | ०–४६–४० |
| २२ | ३५०/२ | ०–०४–०२ | ५६ | ३०५/२ | ०–०२–०६ |
| २३ | ३५०/३ | ०–२४–७९ | ५७ | ३०५/३ | ०–०६–८९ |
| २४ | ३५०/४ | ०–०१–०० | ५८ | ३०५/४ | ०–०४–०२ |
| २५ | ३५१/१ | ०–०५–५४ | ५९ | ४०६/३ | ०–०३–०३ |
| २६ | ३५१/२ | ०–११–५० | ६० | ४०६/४ | ०–४६–७२ |
| २७ | ३४४/१ | ०–००–५९ | ६१ | ४०६/५ | ०–००–०४ |
| २८ | ३४३/१/अ | ०–०८–४४ | ६२ | ४१८ | ०–८८–०४ |
| २९ | ३४३/१/ब | ०–१५–३० | ६३ | ४३०/१ | ०–२८–२४ |
| ३० | ३४३/१/क | ०–१४–२५ | ६४ | ४३०/२ | ०–२६–२८ |
| ३१ | ३४३/२ | ०–१६–४६ | ६५ | ४२९/१ | ०–२७–९८ |
| ३२ | ३४२/४ | ०–०६–४५ | ६६ | ४२९/२ | ०–२९–५२ |
| ३३ | ३४२/५ | ०–०१–८८ | ६७ | ४२८/२ | ०–०८–१५ |
| ३४ | ३४२/६ | ०–०३–२२ | ६८ | ४२८/५ | ०–२५–०६ |
| ३५ | ३४२/७ | ०–००–१२ | ६९ | ४२८/६ | ०–४५–३४ |
| ३६ | ३३७/२ | ०–०५–१४ | ७० | ४२७/४ | ०–११–७३ |
| ३७ | ३३७/३ | ०–२१–४० | ७१ | ४२७/५ | ०–२०–२७ |
| ३८ | ३३७/४ | ०–१०–६० | ७२ | ४१९ | ३–६१–७१ |

दिनांक : २४/०४/२०२५
ठिकाण : पनवेल

जिमाका/राअ/जाहि/३५/२०२५–२६

**सही/–**
प्राधिकृत अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी पनवेल,
उपविभाग, पनवेल

# वसुंधरा अभियानात प्लास्टिकविरोधी कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

दिनांक २२ एप्रिल रोजीच्या जागतिक वसुंधरा दिनापासून १ मे रोजीच्या प्रदूषणमुक्त महाराष्ट्र दिनापर्यंत शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या परिपत्रकानुसार विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये निसर्गाच्या भूमी, जल, वायू, आकाश, ऊर्जा या पंचतत्त्वांच्या संरक्षण व संवर्धनासाठी नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक जनजागृती करीत लोकसहभागातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

त्याचप्रमाणे प्राणी जीवनासह निसर्गाला हानी पोहचविणाऱ्या प्लास्टिक विरोधी मोहिमांवर भर देण्यात येत असून परिमंडळ २ च्या प्लास्टिक प्रतिबंधात्मक भरारी पथकाने उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली मागील ३ दिवसात धडक कारवाई करीत प्रतिबंधात्मक प्लास्टिक वापर सापडलेल्या व्यक्ती व व्यावसायिकांकडून २० हजार रकमेची दंड वसूली केली तसेच ६७ किलो ७०० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त केले. यामध्ये प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.

कोपरखैरणे येथून रामदास वैष्णव यांच्या दुकानात एकल वापर प्लास्टिक आढळल्याने ५ हजार रकमेचा दंड आकारण्यात आला तसेच ४०० ग्रॅम प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला.

ऐरोली टोल नाका या ठिकाणाहून दुचाकीवर ७ किलो प्लास्टिक पिशव्या व एकल वापराचे प्लास्टिक वाहून नेताना आढळल्याने दुचाकी वाहन ताब्यात घेण्यात आले. तसेच सुरेश गुप्ता यांच्याकडून ५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली.

वसुंधरा संरक्षण – संवर्धनाचा संदेश प्रसारित करतानाच, प्लास्टिक हा निसर्गाला व मानवी जीवनाला विघातक असा महत्त्वाचा घटक असून त्या विरोधातील मोहीमही महानगरपालिका तीव्रतेने राबवित आहे. तरी नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णपणे टाळून पर्यायी कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करावा असे आवाहन आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.



# उड्डाणपुलाखाली वाहनांची सर्रास बेकायदा पार्किंग

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ (पूर्व) सेक्टर ३ मधील कै. राजीव गांधी उड्डाणपुलाली सर्रास बेकायदा वाहन पार्किंग केली जात असल्याचे आढळून येते. नेरूळ विभागात बँकासमोर काही मिनिटांसाठी उभ्या केलेल्या वाहनावर वाहतूक विभागाचे टोइंग व्हॅन त्वरित कारवाई करत असते, मात्र चोवीस तास येथे उभ्या असणाऱ्या वाहनावर कारवाई का करीत नाही, असा सवाल वाहन चालक करीत आहेत.

नेरूळ विभागातील पूर्व भागात सेक्टर ३ शिरवणे गाव शेजारी कै. राजीव गांधी उड्डाणपुल आहे. या उड्डाणपुलाच्या खाली रासरोजपणे दुचाकी आणि चारचाकी वाहने उभी असलेली पहावयास मिळतात, मात्र या बेकायदा उभ्या केलेल्या वाहनावर नवी मुंबई वाहतूक विभाग कारवाई करत असल्याचे कधीही निदर्शनास येत नाही. इथं दिवसभर पार्क करून ठेवलेल्या वाहनांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. नवी मुंबई मनपा परिवहन सेवेची बस क्र २१ येथून शिरवणे मार्गे वाशीकडे मार्गक्रमण करीत असते या बसेससह मोठ्या वाहनांना वळसा घालण्यास तारेवरची कसरत करावी लागते .

स्टेशन परिसर, विविध बँकासमोर काही मिनिटांसाठी पार्क करून ठेवलेल्या दुचाकी वाहनावर नवी मुंबई वाहतूक पोलिसांची टोइंग व्हॅन तत्काळ वेळ न दवडता झडप घालते मग इथं कै.राजीव गांधी उड्डाणपुलाच्या खाली पार्क करून ठेवलेल्या वाहनावर कारवाई का करीत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

> *आम्ही नवी मुंबई शहरवाशी असून करदाते आहोत. हॉटेल वा बँकेत काही कालावधी साठी रस्त्यावर उभ्या केलेल्या आमच्या वाहनावर वाहतूक विभाग कारवाई करते तसेच चारचाकी वाहनाला जामर लावते तर दुसरीकडे सार्वजनिक ठिकाणी बेकायदेशीर वाहने उभी केलेली असताना कार्यवाही केली जात नाही.*
>
> **–नारायण शिंदे,** वाहन चालक, नेरूळ

## पहलगाममधील मृतांना करंजाडेत श्रद्धांजली

**उरण : बातमीदार**

शिव प्रतिष्ठानच्या वतीने पहलगाममधील धर्मविरानां कॅण्डल मार्च द्वारे करंजाडे, पनवेल येथे भावपुर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी संदेश पाटील(शहराध्यक्ष),सत्यजित पाटील(शिव प्रतिष्ठान अध्यक्ष), प्रशांत निर्मळ (उपाध्यक्ष),राकेश कुसळे,अविनाश ठोसर, अमर कुसले,अमर सावंत,मानवेंद्र जैस्वाल (उपाध्यक्ष ),सुनील अंबावडे,दीपक चोधरी, ध्रुव शेट्टी, सिद्धांत अंबावडे, आनंद पुजारी,सुषमा मयेकर,(शहराध्यक्षा),ज्योती टोतरे ओंकार आदी मान्यवर उपस्थित होते.





## सकल हिंदू समाज उरणतर्फे भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**उरण : बातमीदार**

जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात २६पेक्षा जास्त निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. या अमानवी कृत्याचा सकल हिंदू समाज उरण तर्फे उरण शहरातील गणपती चौकात तीव्र निषेध करण्यात आला. या हल्ल्यातील मृतात्म्यांना या वेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.

'पाकिस्तान मुर्दाबाद, एक येतो सेफ है, बटेंगे तो कटेंगे आणि आतंकवादांचा खात्मा करा' अश्या घोषणा उपस्थितांतर्फे देण्यात आल्या. यावेळी सकल हिंदू समाज उरणचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## सेंट मेरीज आईसीएसई स्कूलमध्ये झांबियातील विद्यार्थ्यांचे स्वागत

**नवी मुंबई : बातमीदार**

सेंट मेरीज आईसीएसई स्कूल, कोपरखैराणे यांना सेंट इग्नेशियस कॉलेज, झांबिया येथील काही विद्यार्थी आणि एक शिक्षक यांचे स्वागत करण्याचा मान लाभला.

हा सांस्कृतिक देवाण–घेवाण कार्यक्रम सेंट मेरीज आईसीएसई स्कूल आणि ग्रीन कंट्रीब्युटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या दिवशी अर्थपूर्ण संवाद, आकर्षक सांस्कृतिक सादरीकरणे आणि एकत्रित उपक्रमांमधून 'विविधतेत एकता' या संकल्पनेचा सुंदर अनुभव मिळाला.

या कार्यक्रमाचे आयोजन आणि व्यवस्थापन एसएमआयएस च्या लिओ क्लबच्या मार्गदर्शनाखाली बारावीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अतिथ्यांचे मनापासून स्वागत झाले.

या उपक्रमाने विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्यासाठी, परंपरा साजऱ्या करण्यासाठी आणि दीर्घकालीन आंतरसंस्कृतिक नाती निर्माण करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ प्रदान केले.

या देवाण–घेवाण कार्यक्रमाचा सर्व सहभागींच्या मनावर खोल परिणाम झाला असून, शिक्षण आणि सांस्कृतिक समजुतीच्या परिवर्तनकारी शक्तीची पुन:प्रचिती आली आहे



# उन्हाळ्यात आरोग्यविषयक नियम पाळून काळजी घ्या


## नवी मुंबई महापालिकेचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

यावर्षी मार्च महिन्यापासूनच राज्यातील अनेक भागात तापमान वाढले असल्याचे निदर्शनास येत आहे. 'हिट वेव्ह' किंवा 'उष्णतेची लाट' ही एक मूक आपत्ती (सायलेंट डिझास्टर) आहे.

साधारणत: एखादया प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ डिग्री सेल्सियसने जास्त असेल किंवा सलग दोन दिवसांसाठी ४५ डिग्री सेल्सियसपेक्षा जास्त असेल तर त्याला 'उष्णतेची लाट' असे संबोधतात. उष्णतेच्या लाटेमुळे माणसांसोबतच पक्षी, प्राणी, वनस्पती यांची होणारी हानी मोठी आहे. साधारणपणे मार्च ते जून या मान्सून पूर्वकाळात या उष्णतेच्या लाटा येताना दिसतात.

या उष्णतेच्या लाटेचा अपाय




आपल्याला होऊ नये यासाठी व्यक्तिगत पातळीवर प्रत्येकानेच काळजी घेणे जरुरीचे असून यादृष्टीने नवी मुंबईकर नागरिकांनी खबरदारीचा भाग म्हणून काही महत्त्वाच्या गोष्टींचे व नियमांचे पालन करावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

यामध्ये नियम १ : पुरेसे पाणी प्यावे. ताक, लिंबू पाणी, नारळ पाणी असे द्रव पदार्थ घ्यावेत. प्रवास करताना पिण्याचे पाणी आवर्जून सोबत ठेवावे. नियम २ : पांढरे, सौम्य रंगाचे सैलसर कपडे वापरावेत, डोक्यावर टोपी घालावी. नियम ३ : आपली बाहेरील कामे सकाळी १० च्या आत किंवा संध्याकाळी ४ नंतर करावीत. नियम ४ : टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्ष, अननस, काकडी , कोशिंबीर इ. पाण्याचे जास्त प्रमाण असलेली हंगामी फळे व भाज्या खाव्यात. नियम ५ : उन्हात शारीरिक कष्टाची कामे टाळावीत. नियम ६ : दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर जाणे टाळावे. नियम ७ : दुपारी २ ते ४ या वेळात स्वयंपाक करणे टाळावे. नियम ८ : चप्पल न घालता / अनवाणी उन्हात चालणे टाळावे. नियम ९ : लहान मुलांना आणि पाळीव प्राण्यांना वाहनात आत ठेवून गाडी बंद करणे टाळावे. नियम १०: सामूहिक मेळावे/ क्रीडा विषयक कार्यक्रम या दरम्यान पिण्याच्या पाण्याची सोय असेल, थेट सूर्यप्रकाशाशी संपर्क नसेल याची खबरदारी घ्यावी.

नवी मुंबईकर नागरिकांनी उन्हाळ्याच्या कालावधीत वरील नियमांचे पालन करावे आणि उष्माघात टाळावा तसेच उष्माघात संदर्भात लक्षणे आढळून आल्यास त्वरित आपल्या घराजवळील नवी मुंबई महानगरपालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालयातून उपचार घ्यावेत असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले आहे.

## आर्थिक विकासामध्ये एमएमआरडीएचा नवा मापदंड



**नवी मुंबई : बातमीदार**

सार्वजनिक परिवहनाच्या आर्थिक मॉडेलमध्ये नवा मापदंड निश्चित करत, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) २०२४–२५ या आर्थिक वर्षात नॉन–फेअर रेव्हेन्यूमध्ये (प्रवासी भाड्याव्यतिरिक्त मिळणारे उत्पन्न) तिप्पट म्हणजेच जवळपास १२२ कोटींची भरघोस वाढ नोंदवली आहे. गेल्या वर्षीच्या ४२.५ कोटी या उत्पन्नात यंदा थेट १८७ टक्के वाढ झाली आहे. या विक्रमी वाढीमुळे एमएमआरडीएने स्वयंपूर्ण, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि प्रवाशांना सुलभ सेवा देणारी मेट्रो व्यवस्था उभारण्याच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे.

एमएमआरडीएचा एकूण ऑपरेशनल रेव्हेन्यू (क्रियात्मक उत्पन्न) १९० कोटींवरून वाढून थेट २९२ कोटींवर पोहोचला. म्हणजे आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला ठरवलेले २०० कोटींचे लक्ष्य मोठ्या फरकाने ओलांडण्यात आले आहे.

तिकीटाव्यतिरिक्त मिळणारे उत्पन्न मध्ये प्रामुख्याने ऑप्टिकल फायबर केबल (ओएफसी) परवाना शुल्क ६१.७२ कोटी, स्थानकांवरील जाहिराती २३.९५ कोटी, गाड्यांवरील (आतील आणि बाहेरील) जाहिराती ७.४७ कोटी, खाजगी रिटेल आऊटलेट्स आणि किऑस्क ८.२२ कोटी, स्थानक नामकरण व ब्रँडिंग अधिकार ९.७६ कोटी, कर्मचाऱ्यांचे कार्यक्षम व्यवस्थापन ५.४३ कोटी, टेलिकॉम इन्फ्रास्ट्रक्चर उत्पन्न ४.५२ कोटी, इतर उत्पन्न (चित्रीकरणाची परवानगी, स्मॉल सेल, प्रमोशन्स) ०.६५ कोटी याचा समावेश आहे.

प्रवासी भाड्यांतून मिळणारे उत्पन्न १४७ कोटींवरून वाढून १७० कोटींवर पोहोचले असून, ही १५.६ टक्क्यांची वाढ आहे. यासोबतच नॉन–फेअर रेव्हेन्यू (तिकीटाव्यतिरिक्त मिळणारे उत्पन्न )मध्ये झालेली झपाट्याने वाढ ही सार्वजनिक परिवहन व्यवस्था दीर्घकालीन मूल्य निर्माण करताना परवडणारे दर कायम ठेवत कशी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकते, यामध्ये घडलेल्या मूलभूत बदलाचे स्पष्ट संकेत देते आणि भविष्यात उपयुक्त ठरणारी यंत्रणा कशी उभी राहू शकते याचे स्पष्ट उदाहरण आहे.



# अलिबागेत मुस्लिम धर्मीयांकडून दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध

**अलिबाग : प्रतिनिधी**

जम्मू काश्मीरमधील पहलगमच्या बैसरान घाटीमध्ये २२ एप्रिल रोजी तेथे आलेल्या पर्यटकांवर लष्कर-ए-तय्यबा या आतंकवादी संघटनेच्या द रजिस्टन्स फ्रंट गटाच्या वतीने भ्याड हल्ला करण्यात आला. त्या हल्ल्याचा निषेध अलिबागमधील मुस्लिम बांधवांनी रविवारी (दि. २७) केला.

पहलगमच्या बैसरान घाटीमध्ये पर्यटकांवर भ्याड हल्ल्याच्यावेळी आतंकवाद्यांनी तेथे उपस्थित असलेल्या पर्यटकांना त्यांचे नाव, धर्म, विचारला आणि जे हिंदू पर्यटक होते त्यांना मारून टाकले. या हल्ल्यादरम्यान तेथील आतंकवाद्यांनी कलमा बोलण्यास सांगितले. हे खूप संतापजनक आहे. याचा निषेध करण्यासाठी अलिबाग येथील मुस्लिम बांधव बाजारपेठेतील जामा मशिदीसमोर मोठ्या संख्येने जमा झाले. त्यांनी राष्ट्रध्वज हातात घेऊन या घटनेचा निषेध नोंदविला तसेच मृत



पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण केली.

या वेळी मुस्लिम समाजाचे नसीम बुकबाइंददडर, वसीम साखरकर, अश्रफ घट्टे, मुश्ताक घट्टे, जाफर सय्यद, फरीद सय्यद, भाजप शहर अध्यक्ष ॲड अंकित बंगेरा, पोलीस उपअधीक्षक विनीत चौधरी, पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्यासह मोठ्या संख्येने मुस्लिम समाज उपस्थित होता.

# पोलादपूर येथे आपत्ती व्यवस्थापन व सेस फंडातून विविध वस्तूंचे वाटप



**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर येथील कॅ. विक्रमराव मोरे सभागृहात आपत्ती व्यवस्थापन किट्स आणि समाजकल्याण साहित्य वाटपाचा संयुक्त कार्यक्रम पंचायत समितीतर्फे आयोजित करण्यात आला. या वेळी रोहयो, फलोत्पादन व खारजमीन विकासमंत्री भरत गोगावले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

व्यासपीठावर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, अधीक्षक समन्वयक म्हात्रे, तहसीलदार कपिल घोरपडे, गटविकास अधिकारी दिप्ती गाट, माजी जि.प. उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, माजी पं.स. सदस्य यशवंत कासार, विस्तार अधिकारी हंबीर, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश अहिरे, लक्ष्मण मोरे, शंकर बांदल आदी उपस्थित होते.

आगामी काळात आपत्ती निवारणासाठी नदीपात्रातील गाळ उपसा करण्याची आवश्यकता लक्षांत घेऊन महायुती सरकारने महाड विधानसभा मतदारसंघात २० कोटींचा निधी दिला आहे. त्यातील अधिकाधिक निधी पोलादपूर तालुक्यात नद्यांच्या पात्रातील गाळ काढण्यासाठी देऊ, असे सांगून आपत्ती निवारण सामुग्रीची किट्स अडीच लाखांहून अधिक किमतीची असून त्या किट्सचा वापर आपत्ती काळात होण्यासाठी सर्व किट्स ग्रामपंचायतींनी व्यवस्थित ठेवावी, अशी अपेक्षा मंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केली.

तहसीलदार कपिल घोरपडे यांनी प्रास्ताविकात तालुक्यातील ग्रामस्थांनी आपत्ती अनुभवली आहे. त्यामुळे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पोलादपूर येथे जास्त काळ असावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

जि.प.चे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी जिल्हा परिषदेत प्रशासक असल्याने महिला बचतगटांच्या सदस्यांना उसाचा रस काढण्याचे यंत्र आणि बटाटे सोलण्याचे मशीन अशा उपकरणांची वाटपासाठी उपलब्धता निरुपयोगी ठरेल. सरपंच महिला काय करतील तेथे आपत्ती व्यवस्थापन रेस्क्यूसाठी तरुणांना प्रोत्साहन द्यावे, असे सांगून संभाव्य अतिवृष्टी, भुस्खलन व महापूर बाधित ४७ गावांमध्ये सतर्कता निर्माण करण्याचे आवाहन केले.

अधीक्षक समन्वयक म्हात्रे यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी ४०० किट्स उपलब्ध असल्याची माहिती देऊन विविध वस्तूंचे वाटप व ग्रामपंचायतींच्या स्तरावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती दिली.

काळभैरव रेस्क्यू टीमचे दीपक उतेकर यांनी रेस्क्यूबाबत थोडक्यात मार्गदर्शन केले. ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी आपत्ती व्यवस्थापन शब्द अस्तित्वात नसतानासुद्धा महाड आणि पोलादपूर तालुक्यातील जनतेने नैसर्गिक आपत्तीच्या घटना अनुभवल्या आहेत. कशेडी टॅप पोलीस आणि समर्थ मठामार्फत रेस्क्यूवर्क करणाऱ्या तरुणांना बचाव सामुग्रीचे वाटप करून आम्ही सामाजिक बांधिलकी माणुसकी म्हणून व्यक्त केली. ग्रामपंचायतींच्या कार्यालयात बचाव सामुग्री कुलूपबंद राहिल्यास निरुपयोगी ठरेल, अशी शक्यता व्यक्त करीत ग्रामपंचायतींनी स्थानिक तरुणांना या सामुग्रीचे वाटप करण्याचे आवाहन केले.

या वेळी धामणदिवी सरपंच क्षमता बांद्रे, उमरठ सरपंच जयराम मोरे, अनिल दळवी, बोरज सरपंच शिवाजी मालुसरे, ग्रामविकास अधिकारी, महिला बचत गटांच्या प्रतिनिधी, तलाठी व पोलीस पाटील तसेच रेस्क्यू टीमचे सदस्यांचा सत्कार झाला.

# चौकमध्ये निषेध रॅली; बाजारपेठ बंद, पाकिस्तानविरोधी घोषणा

**चौक : प्रतिनिधी**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे अतिरेक्यांनी भ्याड हल्ला करून २६ निष्पाप पर्यटकांची हत्या केली. त्याच्या निषेधार्थ चौक व परिसरातील नागरिकांनी निषेध रॅली काढून पाकिस्तानविरोधात घोषणा दिल्या. या वेळी वैद्यकीय सेवा सोडून सर्व बाजारपेठ बंद ठेवण्यात आली होती.



२२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे अतिरेक्यांनी पर्यटकांवर धर्म विचारून गोळीबार केला. यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. यामध्ये महाराष्ट्रातील सहा पर्यटक मृत्यू पावल्याचे समोर आले. या भ्याड हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी चौक बाजारपेठेमधून रॅली काढत पाकिस्तानविरोधात घोषणा देण्यात आल्या आणि जोरदार निषेध केला. त्याचप्रमाणे २६ मृत पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या वेळी माजी आमदार देवेंद्र साटम, भाजप चौक अध्यक्ष गणेश कदम, सरपंच रवींद्र कुंभार, सुनील गायकवाड, जगदीश हातमोडे, बाबू भोईर, प्रदीप गोंधळी, गुंड्या देशमुख, गणेश मुकादम, उपसरपंच सचिन साखरे, संजय कोंडीलकर, सागर देशमुख यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. पोलीस उपनिरीक्षक विशाल पवार यांनी बंदोबस्त ठेवला होता.

# तळा जि.प. शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश; १८ विद्यार्थी उत्तीर्ण

**तळा : प्रतिनिधी**

इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये रायगड जिल्हा परिषदेच्या तळा प्राथमिक शाळेने घवघवीत यश प्राप्त केले आहे. या वर्षी एकूण २४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मागील तीन वर्षाचा रेकॉर्ड यंदा मोडला आहे. गेल्या वर्षी १३ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन नऊ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले होते.

तळा मराठी शाळेचे विद्यार्थी मागील पाच वर्ष सतत शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेमध्ये यश प्राप्त करीत आहेत. शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये मराठी शाळेच्या शिक्षकांनी संपूर्ण वर्षभर प्रयत्न घेऊन हे यश प्राप्त केले आहे. परीक्षेचे मार्गदर्शक सुनील बयकर नियोजनबध्द पध्दतीने वर्षभर प्रयत्न करत असून त्यांना सहकार्य करणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, मित्तल वावेकर, शिक्षका उषा गुरव, वर्षा माडी, श्री. निकम यांचे सहकार्य लाभले आहे. शिष्यवृत्तीसह विविध उपक्रम राबवून शाळेची गुणवत्ता येथे पहायला मिळत आहे.

या शिष्यवृत्ती परीक्षेत श्रावणी दळवी (२२६ गुण), रूद्र थिटेकर (२२४ गुण), तन्मय पवार (२१८ गुण), काव्या कांबळेकर (२१८ गुण), प्रज्वल गपाट (२१४ गुण), प्रांजल ढाकणे (१९८ गुण), अथर्व फडके (१९० गुण), भक्ती रायफळे (१८६ गुण), भावेश गोळे (१७८ गुण), निधी बटावले (१५४ गुण), दुर्गेश नाडकर (१५२ गुण), दिव्या सुर्वे, अनिमेष पवार व समर्थ वजरकर (१४८ गुण), मानव साळवी (१४४ गुण), शौर्य इंगळे (१४२ गुण), सार्थक वाडेकर (१३६ गुण), कौस्तुभ पायगुडे (१२६ गुण) हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक सुनील बयकर आदींचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# शिळफाटा येथील अभ्यासिका दुर्लक्षित

**खोपोली : प्रतिनिधी**

तत्कालीन जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून खोपोली शीळफाटा येथे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थीवर्गासाठी अभ्यासिकेचा आरंभ करण्यात आला. गेल्या एक ते दीड महिन्यापासून येथे विद्यार्थी असुविधेचा सामना करीत आहेत.

विद्यार्थीवर्गाने खोपोली खालापूर तालुका संघर्ष समितीचे याकडे लक्ष वेधले. समितीच्या वतीने डॉ.शेखर जांभळे व मोहन केदार यांनी पाहणी करून समस्या जाणून घेतल्या. ते आता पाठपुरावा करणार आहेत.

# सुधागडात भाजपतर्फे स्वच्छता मोहीम

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या गाव वस्ती संपर्क अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र जांभूळपाडा येथे स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेच्या माध्यमातून परिसर स्वच्छतेसह नागरिकांपर्यंत विविध योजनांची माहिती पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या मोहिमेदरम्यान भाजप कार्यकर्त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवून स्वच्छतेचा संदेश दिला तसेच लाभार्थींची भेट घेऊन त्यांना विविध सरकारी योजनांची माहिती देण्यात आली. या योजनांमुळे नागरिकांना मिळणाऱ्या लाभांविषयी समाधान व्यक्त करण्यात आले.

भाजप सरकारच्या योजनांमुळे नागरिकांना समाधानकारक लाभ मिळत



असल्याचे स्थानिकांनी सांगितले. गाव वस्ती संपर्क अभियानामुळे लाभार्थींच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

भाजप कार्यकर्त्यांनी लाभार्थींपर्यंत पोहोचून त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. या मोहिमेमुळे गावकऱ्यांमध्ये सकारात्मकता निर्माण झाली असून स्वच्छता आणि योजनांचा प्रचार यासाठी कार्यकर्त्यांचे योगदान उल्लेखनीय ठरले आहे.

या वेळी विठ्ठल सिदकर, हरिश्चंद्र पाटील, भास्कर पार्टे, संदेश लोंढे, विशाल गुरव, रोहित भगत, सतिश पवार, मिलिंद शिंदे, सागर दिक्षित, श्रीराम मनोहर यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागोठण्यात भीम जयंतीनिमित्त मिरवणूक, प्रबोधनात्मक कार्यक्रम

## ज्येष्ठ नेते एस.एन. गायकवाड यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान

**पाली : प्रतिनिधी**

बौद्धजन पंचायत समिती नागोठणे विभाग शाखा क्रमांक ३च्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४वा जयंती महोत्सव धूमधडाक्यात साजरा करण्यात आला. डॉ. आंबेडकर सामाजिक सभागृह एसटी स्टॅण्ड शेजारी भीम जयंतीनिमित्त विविध प्रबोधनात्मक वैचारिक कार्यक्रम, बहुजन महापुरुषांच्या जीवनकार्यावर व्याख्यान, महापुरुषांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक तसेच प्रबोधनात्मक गीत गायन कार्यक्रम पार पडले.

या कार्यक्रमात आंबेडकरी बहुजन चळवळीतील ज्येष्ठ नेते सेवानिवृत्त विस्तार अधिकारी एस.एन. गायकवाड यांना मान्यवरांच्या हस्ते समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी पुरस्कार्थी गायकवाड यांनी समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून पुढील आयुष्यही समाजहित व आंबेडकरी बहुजन चळवळीच्या उन्नतीसाठी खर्ची घालणार असल्याचे सांगितले.

या जयंतीमध्ये भीम अनुयायी व बहुजन समाज बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन जयंतीची शोभा वाढवली. दिवसभर विविध



कार्यक्रम होऊन सायंकाळी बौद्धजन पंचायत समितीचे अध्यक्ष एस.एन. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. या वेळी स्वागताध्यक्ष चंद्रकांत गायकवाड व आंबेडकरी चळवळीतील तरुण तडफदार कार्यकर्ते ॲड. प्रकाश कांबळे यांनी आपल्या मनोगतात नागोठण्यात आंबेडकरी चळवळीचा पाया भक्कम कसा झाला, त्यामागे कोणाकोणाचे योगदान लाभले याकामी संघर्षाची लढाऊ भूमिका कशी राहिली याबाबत सविस्तर माहिती दिली.

या वेळी प्रमुख वक्ते म्हणून भारतीय हितकारणी संघाचे संस्थापक अध्यक्ष सिद्धार्थ शिवमारे सभेला संबोधित केले. त्यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला भारतीय संविधान देऊन लोकशाही प्रणालीवर वाटचाल करण्याची दिशा दिली, असे नमूद केले. संविधानाचे पैलू उलगडताना डॉ. आंबेडकरांनी संविधानात सात अधिकार दिले आहेत, अजून ६३ अधिकार बाकी आहेत. त्यांनी दिलेल्या शिकवणुकीत खूप शिका, उच्च शिक्षण घ्या, एमपीएससी, युपीएससीचे शिक्षण घेऊन अधिकारी बना, शिक्षण घेऊन तुम्ही वकील, डॉक्टर, इंजिनियर व्हा, राष्ट्र उन्नतीसाठी काम करता करता स्वतः सक्षम बना, असे आपल्या मार्गदर्शनात सांगितले. या वेळी शिवमारे यांनी सध्या आंबेडकरी चळवळीपुढे असलेली आव्हाने सांगताना भीमा कोरेगावचा लढा ही विस्तृतपणे मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ कवी प्रभाकर ओव्हाळ यांनी केले.


**Maharashtra Tourism Development Corporation Ltd. (MTDC)**

(A Govt. of Maharashtra Undertaking) Mafatlal House, 1st floor, H.T. Parekh Marg,
169, Backbay Reclamation, Mumbai - 400 020
Tel.: **(9122) 41580992** (Electrical works) / **41580994/95/97** (Civil works)

**E-Tender Notice No. MTDC/Works/2025-26/11-24,33**

Tenders for following work on Percentage Rate (B-1) are invited by the Managing Director, MTDC, Mumbai from eligible Contractors as mentioned in Detailed Tender Notice for below mentioned works.

| Sr No | Name of Work | Cost of Work in Lakhs |
|---|---|---|
| 01 | Repairing Work at MTDC Restaurant Rajiv Gandhi Zoological Park and Wildlife Research Center Katraj Pune, Dist. Pune. | 8.10 |
| 02 | Providing Various Tourism Infrastructural Facilities at Sati Anusaya Mata Mandir Sansthan At Paradsinga Tq.Katol Dist.Nagpur | 70.96 |
| 03 | Up-gradation of 16 AC Room at Ajanta Tourist Resort Fardapur Tq.Soygaon Dist.Chhatrapati Sambhajinagar. | 73.29 |
| 04 | Proposed Construction Ghat & allied Works at Kondoli, Tah:- Washim Dist:- Washim. | 110.16 |
| 05 | Providing Interior Works for Bhaktniwas-Dining hall & Allied Area Development Works at Chintamani Devasthan Mandir Trust Kalamb,Tal & Dist. Yavatmal | 228.11 |
| 06 | Upgradation of MTDC Resort Velneshwar, Dist.Ratnagiri | 264.83 |
| 07 | Up-gradation of MTDC Resort Bodhalkasa, Dist. Gondia | 292.31 |
| 08 | Providing Various Tourism Infrastructural Facilities-Amenities at Sankatmochan Lake, Dist. Yavatmal | 238.55 |
| 09 | Up-gradation of MTDC Tourist Resort at Ajanta T Point Fardapur Tq.Soygaon Dist.Chhatrapati Sambhajinagar. | 314.49 |
| 10 | Up gradation of various tourist facilities at MTDC's Scuba Diving Institute at Tarkarli, Dist. Sindhudurg. | 370.86 |
| 11 | Upgradation & strengthening existing tourist facilities at MTDC's Residency at Kharghar, Dist. Raigad. | 393.65 |
| 12 | Construction of Balance Various Tourism development facilities/amenities at Govardhan Kalagram, Dist. Nashik., Maharashtra. | 380.36 |
| 13 | Providing Electrical Works for MTDC Resort Sahastrakund, Dist. Yavatmal | 147.18 |
| 14 | Providing Electrical Works for Resort Tipeshwar, Dist. Yavatmal | 93.71 |
| 15 | Providing Electrical Works for MTDC Resort at Durga Tekdi, Lonar, Dist. Buldhana. | 222.56 |

All the Details Regarding Schedule of download, e-tender submission etc. can be seen on the website "https://www.mahatenders.gov.in"

Sd/-
Managing Director
MTDC Ltd, Mumbai

ROC-2025-26/No.-5/C 419

# आरसीबीची दिल्लीवर मात

## कृणाल, विराटची शानदार अर्धशतकी खेळी



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

विराट कोहली आणि कृणाल पांड्या यांच्या शतकी भागीदारीच्या जोरावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाने घरच्या मैदानातील पराभवाचा हिशोब रविवारी चुकता केला. दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने दिलेल्या १६३ लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात खूपच खराब झाली होती, पण शेवटी संघाने सहा विकेट्स आणि नऊ चेंडू राखून विजय मिळवत गुणतालिकेत अव्वलस्थान पटकावले.

या मैदानावर धावांचा पाठलाग करणे तितके सोपे नव्हते. दिल्लीच्या गोलंदाजांनी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला सुरुवातीला तीन मोठे धक्के दिले. सलामीला आलेला जेकब बेथल सहा चेंडूत अवघ्या १२ धावा करत माघारी परतला. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या देवदत्त पडिक्कलला खातेही उघडता आले नाही. तो शून्यावर माघारी परतला. मग करूण नायरच्या रॉकेट थ्रोमुळे कर्णधार रजत पाटीदारला पॅव्हेलियनची वाट धरावी लागली. तो अवघ्या सहा धावांवर माघारी परतला.

सुरुवातीला मोठे धक्के बसल्यानंतर कृणाल पांड्या फलंदाजीला आला. टीम डेव्हिड फलंदाजीसाठी उपलब्ध असताना कृणालला फलंदाजीला पाठवणे हाच या सामन्यातील टर्निंग पॉईंट ठरला. दोघांनी मिळून ११९ धावांची महत्वपूर्ण भागीदारी केली. कृणालने एका बाजूने तुफान फटकेबाजी केली, तर विराटने त्याला साथ दिली. विराट ४७ चेंडूंचा सामना करीत ५१ धावांची खेळी करून माघारी परतला, तर कृणाल शेवटपर्यंत उभा राहिला आणि त्याने संघाला विजय मिळवून दिला. कृणालने ४७ चेंडूत पाच चौकार आणि चार षटकारांनिशी नाबाद ७३ धावा केल्या.

तत्पूर्वी दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात धावफलकावर १६२ धावा लावल्या होत्या. सलामीवीर अभिषेक पोरेल याने ११ चेंडूत २८ धावा करून तंबूचा रस्ता धरला. त्याची जागा घेण्यासाठी आलेल्या करुण नायरला या सामन्यात फारशी चमक दाखवता आली नाही. तो अवघ्या चार धावांवर बाद झाला. उप कर्णधार फाफ ड्युप्लेसी याने २२ धावांची खेळी केली. दिल्लीकडून लोकेश राहुलने ३९ चेंडूत तीन चौकारांच्या मदतीने केलेली ४१ धावांची खेळी सर्वोच्च ठरली. त्याच्याशिवाय ट्रिस्टन स्टब्सने १८ चेंडूत ३४ धावा केल्याचे पहायला मिळाले. कर्णधार अक्षर पटेलने १५ धावांचे योगदान दिले, तर विपराज निगमने सहा चेंडूत १२ धावांची उपयुक्त खेळी केली.

आरसीबीकडून भुवनेश्वर कुमारने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. याशिवाय जॉस हेजलवूडने दोन, तर यश दयाल आणि क्रुणाल पांड्याने प्रत्येकी एक विकेट घेतली.

# कबड्डी स्पर्धेत बल्लाळेश्वर पाली संघ विजेता



**पाली : प्रतिनिधी**

श्री काळभैरव क्रीडा मंडळ नांदगाव, ठाणे, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड तालुका स्पोर्ट्स व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन नांदगाव विद्यालयाच्या क्रीडांगणावर करण्यात आले होते. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचा मानकरी श्री बल्लाळेश्वर पाली संघ ठरला.

स्पर्धेत तालुक्यातील ३२ संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेदरम्यान शिवकन्या पाली आणि दिघेवाडी या महिलांच्या संघामध्ये प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला.

द्वितीय क्रमांक भैरीनाथ वावे, तृतीय भैरवनाथ नागशेत, चतुर्थ रणधुरंधर पाली या संघाने मिळवला. चारही विजेत्या संघांना रोख आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू राजेश भस्मा (पाली), उत्कृष्ट चढाईपटू प्रसाद हिर्डेकर (वावे), उत्कृष्ट पकड करणारा सुचित बेलोसे (नागशेत) आणि पब्लिक हिरो प्रणय सकपाळ (पाली) ठरला. या खेळाडूंना सायकल देण्यात आली.

# अभिषेक नायर 'मुंबई'चा मेंटॉर

**मुंबई : प्रतिनिधी**



भारतीय संघाचा माजी क्रिकेटपटू अभिषेक नायर याला टी-२० मुंबई लीगच्या तिसऱ्या हंगामात मुंबई साउथ सेंट्रल मराठा रॉयल्स या संघाचा मेंटॉर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ही लीग येत्या २६ मेपासून सुरू होणार आहे.

अभिषेक नायरला अलीकडेच भारतीय क्रिकेट संघाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदावरून काढून टाकण्यात आले होते, परंतु त्याने तातडीने नव्या संधी स्वीकारल्या आहेत. सध्या तो इंडियन प्रीमियर लीगमध्ये कोलकाता नाइट रायडर्सच्या सहाय्यक प्रशिक्षकपदी कार्यरत आहेत. आता त्याला टी-२० मुंबई लीगच्या तिसऱ्या हंगामात मुंबई साउथ सेंट्रल मराठा रॉयल्स संघाचा मेंटॉर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तो माजी जलदगती गोलंदाज अमित दानी यांच्यासोबत काम करेल तसेच ७ मे रोजी होणाऱ्या खेळाडूंच्या लिलावात संघाला मार्गदर्शन करेल.

# धाटाव क्रीडा संकुलात उन्हाळी प्रशिक्षण शिबिर

**धाटाव : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या क्रीडा विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार धाटाव येथील रोहा तालुका क्रीडा संकुलात दहा दिवसीय उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांच्या मार्गदर्शनानुसार सुरु करण्यात आले. या शिबिरात शंभर विद्यार्थी सहभागी झाले आहेत.



शिबिरात कबड्डी, व्हॉलिबॉल, मिक्स बॉक्सिंग, अथॅलेटिक, कराटे, कुस्ती, लाठी-काठी या क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण दिले जात आहे. रोहा तालुक्यातील क्रीडा मार्गदर्शक रवींद्र कान्हेकर, अमित दळवी, राकेश म्हसकर, प्रशांत मोहिते, विनायक सकपाळ, रोहन शेवाळे, दृती लाड, सिद्धी सकपाळ, मुकेश भगत, उत्कर्ष घाणेकर, श्रेयस म्हसकर, अमोल नाळे हे तज्ज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत.

रोहा तालुका क्रीडा संकुलात क्रिकेट, कबड्डी, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन या खेळांची मैदाने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा संपलेल्या असल्याने तालुक्यातील विद्यार्थ्यांनी क्रीडा संकुलात प्रशिक्षणासाठी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले. प्रशिक्षणादरम्यान खेळाडूंना अल्पोपहार देण्यात येत आहे. पहिल्यांदाच अशा भव्य क्रीडा प्रशिक्षणाचे आयोजन केल्याने पालकवर्गाने समाधान व्यक्त केले आहे.

# महाडमध्ये रिक्षावाल्यांची क्रिकेट स्पर्धा रंगली

## जुना पोस्ट नाका रिक्षा स्टॉप ए संघ विजयी



**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड तालुका रिक्षा युनियन अंतर्गत आयोजित क्रिकेट स्पर्धा रविवारी (दि. २७) शहरातील क्रांतिस्तंभ मैदान येथे झाली. या स्पर्धेतील अंतिम सामन्यात जुना पोस्ट नाका रिक्षा स्टॉप ए संघाने रायगड नातेखिंड रिक्षा स्टॉप संघाला अटीतटीच्या सामन्यात एका धावेने पराभूत करीत तिसऱ्या चषकावर आपले नाव कोरले.

स्पर्धेत महाड एसटी स्टॅण्ड नाईट रिक्षा स्टॉप संघ, दस्तुरी नाका रिक्षा स्टॉप संघ ए व बी, वीरेश्वर मंदिर रिक्षा स्टॉप संघ, जुना पोस्ट नाका रिक्षा संघ ए व बी, भाजी मंडई रिक्षा स्टॉप संघ, शिरवली महाडिक कोंड रिक्षा स्टॉप संघ, रायगड नातेखिंड रिक्षा स्टॉप संघ, वेलकम रिक्षा स्टॉप संघ, श्रीराम मंदिर रिक्षा स्टॉप संघ, आणि नवेनगर रिक्षा स्टॉप संघ अशा १२ संघानी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेचे उद्घाटन युनियनचे अध्यक्ष रोहित रवींद्र पाटील आणि हितचिंतक सिद्धेश पाटेकर यांच्या हस्ते झाले.

रायगड नातेखिंड रिक्षा संघ उपविजेता ठरला, तर तृतीय पारितोषिक वेलकम रिक्षा स्टॉप संघाने पटकाविले. स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज बंटी जाधव, तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून हरीश महाडिक याची निवड झाली. विजेते संघ आणि विशेष कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना गौरविण्यात आले.

# पंतसह लखनऊच्या सर्व खेळाडूंना दंड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सविरुद्धच्या पराभवानंतर लखनऊ सुपर जायंट्सच्या जखमेवर मीठ चोळणारी माहिती समोर आली. बीसीसीआयने



स्लो ओव्हर रेटमुळे कर्णधार ऋषभ पंत आणि लखनऊच्या सर्व खेळाडूंना दंड ठोठावला आहे.

आयपीएलद्वारे जारी करण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, मुंबईच्या वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात रविवारी सामना खेळला गेला. या सामन्यात लखनऊच्या संघाने धीम्या गतीने गोलंदाजी केली. यामुळे लखनऊचा कर्णधार ऋषभ पंतला दंड ठोठावण्यात आला. या हंगामात दुसऱ्यांदा लखनउच्या संघाने धीम्या गतीने गोलंदाजी केल्यामुळे ऋषभ पंतकडून २४ लाख आणि इम्पॅक्ट प्लेअरसह संघातील प्लेईंग इलेव्हनचा भाग असलेल्या खेळाडूंकडून सहा लाख किंवा त्यांच्या मॅच फीच्या २५ टक्के रक्कम दंड आकारण्यात येईल.

# तौहीद हृदोयवर चार सामन्यांची बंदी

**ढाका : वृत्तसंस्था**

सध्या बांगलादेशमध्ये ढाका प्रीमिअर डिव्हिजन क्रिकेट लीग सुरू आहे. या लीगदरम्यान बांगलादेश क्रिकेट बोर्ड म्हणजेच बीसीबीने स्टार खेळाडू तौहीद हृदोयवर चार सामन्यांची बंदी घातली आहे. तौहीदने एका सामन्यात पंचाशी वाद घातला होता.

या लीगमध्ये तौहीद मोहम्मडन स्पोर्टिंग क्लबचे नेतृत्व करीत आहे. त्याने १२ एप्रिल रोजी पंचाशी वाद घातला. त्यानंतर २६ एप्रिलला गाजी ग्रुप क्रिकेटर्सविरुद्ध सामन्यातही बाद झाल्यानंतर त्याने पंचांनी दिलेल्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली होती.

# फुटबॉल लीगमध्ये लिव्हरपूल संघ चॅम्पियन



**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लिश प्रीमियर लीग २०२४-२५च्या शेवटच्या साखळी सामन्यात लिव्हरपूलने टॉटेनहॅम हॉटस्परवर ५-१ असा एकतर्फी विजय मिळवला. या विजयासह लिव्हरपूलने २०व्यांदा प्रीमियर लीगचे जेतेपद पटकावले आणि मँचेस्टर युनायटेडच्या विक्रमाशी बरोबरी केली. सामन्यात लिव्हरपूलने सुरुवातीच्या पिछाडीनंतर जबरदस्त पुनरागमन करीत संपूर्ण सामन्यावर वर्चस्व गाजवले.

सामन्याच्या १२व्या मिनिटाला टॉटेनहॅमच्या डोमिनिक सोलंकेने जेम्स मॅडिसनच्या कॉर्नरवर शानदार हेडर गोल करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. या गोलने लिव्हरपूलला धक्का बसला. लिव्हरपूलचे चाहतेही स्तब्ध झाले, पण संघाने गडबडून न जाता सामन्याची सूत्रे हाती घेतली आणि आक्रमणाला धार दिली.

हा विजय लिव्हरपूलचा २०वा प्रीमियर लीग/इंग्लिश फर्स्ट डिव्हिजनचा किताब होता, ज्याने मँचेस्टर युनायटेडच्या २० जेतेपदांच्या विक्रमाशी बरोबरी केली. प्रशिक्षक आर्ने स्लॉट यांच्या मार्गदर्शनाखाली लिव्हरपूलने संपूर्ण हंगामात सातत्यपूर्ण कामगिरी दाखवली. त्यांनी ३८ सामन्यांत ८२ गुणांसह प्रीमियर लीग २०२४-२५चे जेतेपद पटकावले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com